सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. २२ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५० पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर पंतप्रधान मोदींचा राजस्थान दौरा

राजस्थान : पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली. यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर करुन अतिरेक्यांचे पाकिस्तानमधील तळ नष्ट केले. या ऑपरेशनच्या यशानंतर पंतप्रधान मोदी पहिल्यांदाच राजस्थानचा दौरा करणार आहेत. दिल्लीतून विशेष विमानाने पंतप्रधान राजस्थानला जाणार आहे. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याची सुरुवात बिकानेरमधून गुरुवार २२ मे रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. देशनोक इथल्या करणी माता मंदिरात जाऊन दर्शन घेऊन पंतप्रधान दौऱ्याची औपचारिक सुरुवात करतील.

पंतप्रधान मोदींच्या हस्ते सकाळी साडेअकरा वाजता अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत पुनर्विकसित केलेल्या देशनोक रेल्वे स्थानकाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी पंतप्रधान बिकानेर - मुंबई एक्स्प्रेस रेल्वेगाडीला हिरवा झेंडाही दाखवतील. त्यानंतर, ते २६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि राष्ट्रार्पण करणार आहेत . यानिमित्ताने पंतप्रधान पलाना इथे एका जाहीर कार्यक्रमाला संबोधितही करतील.

पंतप्रधान भारतातील अठरा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ८६ जिल्ह्यांमधील १०३ पुनर्विकसित अमृत स्थानकांचे उद्घाटनही करणार आहेत. या रेल्वे स्थानकांसाठी अकराशे कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे. मृत भारत स्थानक योजनेअंतर्गत तेराशेपेक्षा जास्त स्थानकांचा आधुनिक सेवा सुविधांसह पुनर्विकास केला जात आहे. याअंतर्गत रेल्वे स्थानकांमध्ये प्रवाशांसाठीच्या सोयी सुविधांचा विस्तार केला जात असून, या रेल्वे स्थानकांच्या उभारणीत प्रादेशिक वास्तुकलेचे प्रतिबिंब उमटेल अशा दृष्टीने त्यांची रचना केली गेली आहे. या योजनेअंतर्गतच पुनर्विकसित केले गेलेले देशनोक रेल्वे स्थानक हे करणी माता मंदिराला भेट देणारे भाविक आणि पर्यटकांसाठी महत्वाचे स्थानक आहे. त्या अनुषंगाने या स्थानकाची बांधणी ही करणी माता मंदिराची स्थापत्यकला, तसेच मंदिराच्या कमानी आणि स्तंभांवरून प्रेरित आहे. याचप्रमाणे तेलंगणामधील बेगमपेट रेल्वे स्थानक देखील काकतीय साम्राज्याच्या स्थापत्यकलेपासून प्रेरणा घेत



उभारले गेले आहे. तर बिहारमधील थावे रेल्वे स्थानकात ५२ शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माता थावेवालीची प्रचिती देणारी विविध भित्तिचित्रे, कलाकृती आणि मधुबनी चित्रकला शैलीत साकारलेल्या चित्रांचा अंतर्भाव केला आहे. अशाच प्रकारे गुजरातमधील डाकोर रेल्वे स्थानक देखील रणछोडरायजी महाराजांपासून प्रेरणा घेत उभारले गेले आहे. अशापद्धतीने देशभरातली पुनर्विकसित केलेली अमृत स्थानकांच्या उभारणीत आधुनिक पायाभूत सुविधांना सांस्कृतिक वारसा, दिव्यांगजन अनुकुल सोयी सुविधांसह जनसामान्यांसाठीच्या सुविधा आणि प्रवासाचा समृद्ध अनुभव घेता येईल अशा प्रकारच्या शाश्वत पद्धतींचे अनोखे एकात्मिकरण घडवून आणले आहे.

देशभर विस्तारलेल्या रेल्वे सेवा जाळ्याचे शंभर टक्के विद्युतीकरण करण्याच्या दिशेने भारतीय रेल्वेची वाटचाल सुरू आहे. यामुळे रेल्वेचे कार्यान्वयन अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक होऊ शकणार आहे. याच अनुषंगाने पंतप्रधान चुरू - सादुलपूर या रेल्वे मार्गाची (५८ किमी) पायाभरणीही करतील, तसेच ते सूरतगड-फलोदी (३३६ किमी), फुलेरा-डेगाना (१०९ किमी), उदयपूर-हिम्मतनगर (२१० किमी), फलोदी-जैसलमेर (१५७ किमी) आणि समदारी-बाडमेर (१२९ किमी) या रेल्वे विद्युतीकरण पूर्ण झालेल्या रेल्वे मार्गांचे राष्ट्रार्पण करतील.

राज्यातील रस्तेविषयक पायाभूत सुविधांना मोठी चालना देत पंतप्रधान या प्रसंगी ३ वाहनोपयोगी भुयारी मार्गांचे बांधकाम तसेच राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण आणि बळकटीकरण या कामांची पायाभरणी करतील. त्यांच्या हस्ते राजस्थानातील सात रस्ते प्रकल्पांचे लोकार्पण देखील होईल.सुमारे ४८५० कोटी रुपयांहून अधिक खर्चाचे हे रस्ते प्रकल्प त्या भागांतील वस्तू आणि माणसे यांच्या अधिक सुलभ गतिशीलतेला चालना देतील. हे महामार्ग भारत-पाकिस्तान सीमेपर्यंत विस्तारण्यात येणार असून त्याद्वारे संरक्षण दलांची त्या भागापर्यंत पोहोच सुधारून, भारताच्या संरक्षण पायाभूत सुविधा अधिक बळकट होतील.

सर्वांसाठी विजेची उपलब्धता तसेच हरित आणि स्वच्छ उर्जा मिळण्याच्या संकल्पनेला पुढे नेत पंतप्रधानांच्या हस्ते बिकानेर तसेच दिडवाना कूचमन मधील नवा येथील सौर उर्जा प्रकल्पांच्या उभारणीसह विविध उर्जा प्रकल्पांचा कोनशीला समारंभ होईल. तसेच यावेळी सिरोही ट्रान्समिशन लिमिटेडच्या भाग ब पॉवर ग्रीडच्या आणि मेवाड ट्रान्समिशन लिमिटेडच्या भाग ई पॉवर ग्रीडच्या इव्हॅक्युएशनसाठी संप्रेषण यंत्रणांची देखील कोनशीला ठेवण्यात येईल. पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी, बिकानेर येथील सौर उर्जा प्रकल्प, पॉवर गिड नीमच तसेच बिकानेर संकुलातून इव्हॅक्युएशनसाठी संप्रेषण यंत्रणा आणि स्वच्छ उर्जा पुरवून कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या उद्देशाने फतेहगड - २ उर्जा केंद्राच्या निर्मिती क्षमतेत वाढ यांसह विविध उर्जा प्रकल्पांचे उद्घाटन होईल.

## हेरगिर ज्योती मल्होत्राची डायरी पोलिसांच्या हाती, डायरीमध्ये खुलासे...

पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या ज्योती मल्होत्राला अटक करण्यात आली आहे. ज्योती मल्होत्राची कसून चौकशीही सुरु आहे. दरम्यान ज्योती मल्होत्राची डायरी आता पोलिसांच्या हाती लागली आहे. या डायरीत तिने पाकिस्तानला जाऊन आल्यानंतरचे काही माहिती दिली आहे.

डायरी पोलिसांच्या हाती

ज्योती मल्होत्राची सुरक्षा यंत्रणांकडून कसून चौकशी केली जाते आहे. तिने पाकिस्तानला काय काय माहिती पुरवली आहे? हे जाणून घेतलं जातं आहे. दरम्यान पोलिसांना तिची एक डायरी मिळाली आहे. ही डायरी २०१२ चं कॅलेंडर असलेली आहे. डायरीमध्ये पाकिस्तानबाबत काय वाटतं ते ज्योतीने लिहिलं आहे. ज्योती म्हणते, हम सभी एक धरती, एक मिट्टी के बने हैं. पाकिस्तानात फिरण्यासाठी फारच कमी वेळ मिळाला असंही ज्योतीने लिहिलं आहे.

दिलों में जो गिले शिकवे हैं वो मिट जाएं...

ज्योती तिच्या डायरीत लिहिते, सरहदो की दूरियां पता नहीं कबतक बरकरार रहेंगी, पर दिलों में जो गिले शिकवे हैं वो मिट जाएं पाकिस्तान सरकारला मी विनंती करते की त्यांनी भारतीय लोकांसाठी गुरुद्वारे आणि मंदिरं खुली करावीत. त्यांनी तसं केलं तर पाकिस्तानात हिंदू जास्त प्रमाणावर येतील. तसंच १९४७ मध्ये फाळणीच्या वेळी जे लोक वेगळे झाले आहेत असे लोक, अशी कुटुंबं एकत्र येण्यास मदत होईल.

## युपीएससीची फसवणूक करणाऱ्या पूजाला खून केला नाही म्हणून जामीन

नवी दिल्ली : णझडउ अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाची फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या पूज खेडकरला सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन दिला आहे. पूजावर फसवणुकीचा आरोप आहे याची नोंद घेताना तिने हत्या केलेली नाही अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.

पूजाने कोणता गंभीर गुन्हा केला आहे ? ती ड्रग्ज माफिया किंवा अतिरेकी नाही, तिने हत्या केलेली नाही, ती एनडीपीएस कायद्यांतर्गत आरोपी नाही; अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर करताना केली. पूजावर जे आरोप आहेत त्यांचा तपास करण्यासाठी एखादी व्यवस्था अर्थात सॉफ्टवेअर हवे. यामुळे निश्चित वेळेत तपास करुन पुढील कारवाई करता येईल. पूजाने आतापर्यंत सर्व काही गमावले आहे. पूजाला आता कुठेही नोकरी मिळणार नाही; असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बीव्ही नागरत्ना आणि सतीश चंद्र शर्मा म्हणाले.

नागरी सेवा परीक्षेत अपंगत्व आणि ओबीसी आरक्षणाचा गैरफायदा घेणे. आरक्षणाच्या तरतुदींचा गैरफायदा घेण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाची फसवणूक करणारी माहिती सादर करणे; असे गंभीर आरोप पूजा खेडकरवर आहेत. या प्रकरणात सुरू असलेल्या तपासाला पूजाने सहकार्य केलेले नाही. ही कारणं देत दिल्ली पोलिसांच्या वकिलाने पूजाच्या अटकपूर्व जामिनाला तीव्र विरोध केला. यावर बोलताना प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेता, दिल्ली उच्च न्यायालयाने पूजाला जामीन मंजूर करायला हवा होता असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने पूजा खेडकरला तपास कामात सहकार्य करण्याचे निर्देश दिले.

पूजा खेडकरने आरक्षणाचे फायदे मिळवण्यासाठी २०२२ च्या यूपीएससी परीक्षेच्या अर्जात चुकीची माहिती दिल्याचा आरोप आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) दाखल केलेल्या लेखी तक्रारीच्या आधारे जुलै २०२४ मध्ये खेडकरविरुद्ध बनावट कागदपत्रे, फसवणूक, आयटी कायद्याचे उल्लंघन आणि अपंगत्व कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली एफआयआर नोंदविण्यात आला आहे. बनावट कागदपत्रे तयार करण्याकरिता मदत करणाऱ्यांची ओळख पटविण्यासाठी पूजाची काही काळ कोठडीत चौकशी आवश्यक आहे, असे दिल्ली पोलिसांचे म्हणणे आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने पूजाने हत्या केलेली नाही, अशी टिप्पणी करत तिला अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

## २७ नक्षलवादी ठार, चार जिल्ह्यांत नक्षलवाद्यांविरुद्ध कारवाई सुरू

नारायणपूर : छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात सुरक्षा पथक आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अबुझहमाडच्या जंगलात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई सुरू केली आहे. दंतेवाडा, नारायणपूर, विजापूर आणि कोंडागाव जिल्ह्यांच्या सीमेवर जंगलात चकमक सुरू आहे. आतापर्यंत २७ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे. अनेक नक्षलवादी जखमी झाले आहेत.

सुरक्षा पथकांकडून यावेळी जिल्हा राखीव रक्षक हे नक्षलवाद्यांविरुद्धच्या चकमकीत आघाडीवर आहेत. दोन्ही बाजूंकडून अधूनमधून गोळीबार सुरू आहे. अनेक नक्षलवादी मारले गेल्याचे वृत्त आहे.



वरिष्ठ पोलीस अधिकारी सुरक्षा पथकांना नक्षलवाद्यांविरुद्धच्या कारवाईसाठी मार्गदर्शन करत आहेत. छत्तीसगडमध्ये सुरू असलेल्या ताज्या कारवाईत नक्षलवादी रुपेश आणि आणखी काही नक्षलवाद्यांचे नेते यांना सुरक्षा पथकांनी घेरले आहे.

नक्षलवाद्यांच्या सामर्थ्याचा बीमोड करण्यासाठी व्यापक कारवाई सुरू आहे. या चकमकीत सुरक्षा पथकांकडील एक जवान जखमी झाला आणि एक जण हुतात्मा झाला.

## लामगव्हाण येथे वीज पडून मेंढपाळ महिला मृत्यु

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २० में पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील लामगव्हाण शिवार येथे एका २५ वर्षिय महिलेचा वीज पडून मृत्यू झाला आहे. सविस्तर माहिती अशी की गेल्या काही दिवसांपासून काळेवाडी ता पाथर्डी, जिल्हा अहिल्याबाई नगर ह मु लामगव्हान येथे दहा ते बारा महिला व पुरुष धनगर समाजाचे मेंढपाळ कुटुंब लोहगाव भागातील लामगव्हाण गायरान शेत शिवारात मेंढ्या चराई करीता वास्तव्यास आहे,दि १९ सोमवार रोजी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाला सुरुवात



झाल्याने प्रियांका काळे व पती बैलगाडी भोवती पाल ठोकत असताना आकाशात एकदम कडाडलेल्या वीजेचा जोरदार अंगाला धक्का बसल्याने या महिलेचा मृत्यू झाला , यावेळी पती, व पाच व तीन वर्षे वयाची दोन लहान मुले, बैलगाडी जवळ होते , ते मात्र यात बचावले आहे, लामगव्हाण येथील शेतकरी सुखदेव गंवादे, बद्रीनाथ जाधव, नाना शिंदे,बबन शिंदे, विलास मिसाळ, आदींनी घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेऊन प्रियांका काळे महिलेला ट्रॅक्टरने गावात आणून जीप वाहनाने बिडकीन ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ अस्मा शेख यांनी तपासून मृत्यू घोषित केले, रात्री उशिरा शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे पुढील तपास करीत आहे, व घटनास्थळी महसूल विभागाचे तलाठी सरिता पाटील यांनी भेट दिली.

**या मृत्यु महिलेच्या कुटुंबातील पती व दोन लहान मुलं आहेत त्यांना महाराष्ट्र राज्य शासनाने मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधीतून या कुटुंबाला मदत करावी अशी मागणी शारदा पांढरे राज्य पाल नियुक्ती मेंढपाळ विकास समिती चे सदस्य यांनी केली आहे.**

## ५५ वर्षीय शेतकऱ्याचा शॉक लागून मृत्यू



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ मे : पैठण तालुक्यातील लोहगाव येथील ५५ वर्षीय एका शेतकऱ्याचा रोहित्रा वरील फ्युज टाकताना विद्युत शॉट लागून दुर्दैव मृत्यू सविस्तर माहिती अशी की मावसगव्हाण शिवारातील गट नंबर ५३ मध्ये संजय मुरलीधर इथापे वय ५५ वर्ष रा लोहगाव ता पैठण दि २१ बुधवार रोजी सकाळी आठ दरम्यान मावसगव्हाण शिवारातील शेती पिकांत वाढलेल्या तणावर तणनाशक फवारणी करण्यासाठी पाण्याची आवश्यकता असल्याने विद्युत पंप वीज पुरवठ्यासाठी शेती गट नंबर ५३ मधील रोहित्रावरील किटकॅट फ्युज टाकताना विद्युत शॉक लागल्याने संजय इथापे यांचा मृत्यू झाल्याची घटना सकाळी आठ वाजे दरम्यान घडली, त्यानंतर काही वेळीने जायकवाडी धरणात मासेमारी करणारे,व बकऱ्या चालण्यासाठी जाणाऱ्या लोकांच्या निदर्शनास हि घटना आली, त्यांनी ही माहिती मावसगव्हाण लोहगाव गावातील गणेश इथापे, पोलीस पाटील किरण वाघ, अविनाश इथापे,निलेश इथापे,किरण इथापे, आदींनी घटना स्थळी जाऊन संजय इथापे यांना वाहनाने बिडकीन ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉक्टर यांनी तपासून मृत्यू घोषित केले, वैद्यकीय अधिकारी डॉ अस्मा शेख यांनी शवविच्छेदन करुन मृत्युंदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे पुढील तपास करीत आहेत.

## मंजरथ येथील घाटाची स्वच्छता करत केली गंगाआरती

### अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी वर्षानिमीत्त भाजपाचा उपक्रम

माजलगाव, प्रतिनिधी: पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमीत्त तालुक्यातील मंजरथ येथील गोदावरी नदीकाठावरी घाटाची स्वच्छता करत गंगाआरती भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज दि. २१ मे २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता करण्यात आली.

यावेळी भाजपाच्या तालुकाध्यक्षा रूपाली शरद कचरे, ज्ञानेश्वरी सरवदे, विनायक रत्नपारखी, डॉ. अभिजीत सोळंके, शरद कचरे, संतोष वाघमारे, गणेश जोशी, मनोज कोरडे, अविनाश कांडुरे, गौरी देशमुख, वैष्णवी होके यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना रूपाली कचरे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जिवनचरित्रावर प्रकाश टाकला. एक सक्षम



आणि न्यायप्रिय शासक म्हणुन अहिल्याबाई यांची ओळख आहे. त्यांनी राज्यकारभारात धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करत कारभार केला. अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि जलव्यवस्थापनाची कामे केली. ज्यामुळे लोकांना अनेक सुविधा मिळाल्या. तालुक्यातील मंजरथ येथील गोदावरी नदीवरील घाट देखील त्यानीच बांधलेला असुन आजघडीला सुस्थितीत आहे. परंतु येणा-या भाविकांच्या वर्दळीने मोठी अस्वच्छता निर्माण झाली होती. त्यामुळे अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधुन गोदाघाटाची स्वच्छता करण्यात आली तसेच गंगा आरती देखील करण्यात आली. यावेळी गावातील महिला, पुरूष व भाजपा कार्यकर्त्यांसह शंभरपेक्षा अधिक भाविकांची आरतीला उपस्थिती होती.

## वादळी वाऱ्याने पोरगाव परिसरातील डाळिंब बागाचे मोठे नुकसान



बिडकीन दि २१ मे पैठण तालुक्यातील पोरगांव व परिसरातील गावांमध्ये दि २० में मंगळवार रोजी दुपारी तीन वाजेच्या दरम्यान अचानक आलेले वादळी वारे व गडगडाटी पावसाने पोरगाव परिसरातील अक्षरशः डाळिंब झोड पून काढले. अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने डाळिंब व इतर फळबाग पिकांचे मोठे नुकसान झाले. वर्षभर शेतकऱ्याने काबाडकष्ट करून पिकवलेल्या डाळिंबाच्या बागाचे काही दिवसानंतर हार्वेस्टिंग होणार होते. पण अचानक आलेल्या सुलतानी संकटाने डाळिंब बाग शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले. यांत डाळिंब पिकावर टाकलेली अच्छादन सुद्धा उडून गेले तर अनेक फळबागांची झाडें उनमळून पडली. झालेल्या नुकसानीचे महसूल विभागाने पंचनामे करून शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाई मदत मिळावी अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत होती.

## काशी, मथुराच नव्हे, तर प्रत्येक मंदिर मुक्तीसाठी हिंदूंचा सहभाग अत्यावश्यक ! : अधिवक्ता विष्णु जैन

फोंडा, गोवा - एकीकडे बहुसंख्य हिंदूंना धर्माच्या आधारावर कोणत्याच सुविधा मिळत नाही; याउलट अल्पसंख्यांक म्हणून अन्य धर्मियांना मात्र 'अल्पसंख्यांक आयोगा'कडून ३ हजार २०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रुपयांच्या सुविधा मिळतात. उत्तर प्रदेश येथील अल्पसंख्याकांच्या एक वैद्यकीय शिक्षण संस्थेत प्रवेश मिळण्यासाठी हिंदू धर्मांतर करून प्रवेश घेत आहेत, इतकी गंभीर स्थिती आहे. 'वक्फ बोर्डा'त केवळ २ अहिंदू सदस्य घेतले, तर लगेच 'सरकार असे करू शकत नाही', असा न्यायालय निर्णय देते. अहिंदूंचे एकही प्रार्थस्थळ, श्रद्धास्थान सरकारच्या नियंत्रणात नाही, तर प्रत्येक राज्यातील विविध कायद्यांद्वारे हिंदूंची मंदिरे सरकारच्या नियंत्रणात आहेत. काशी-मुथरा येथील मंदिरांच्या मुक्तीचा कायदेशीर लढा आम्ही देत आहोत. केवळ हे पुरेसे नसून देशातील प्रत्येक मंदिर मुक्त करण्याच्या लढ्यात हिंदूंचा सहभाग अत्यावश्यक आहे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी केले.

सनातन संस्थेने आयोजित केलेल्या




'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त ते बोलत होते. या प्रसंगी 'सेव कल्चर सेव भारत फाऊंडेशन'चे श्री. उदय माहुरकर, चंडीगढ येथील लेखक आणि विचारवंत श्री. नीरज अत्री, तसेच हिंदु जनजागृती समितीचे श्री. रमेश शिंदे आणि सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'हिंदु राष्ट्र का हवे ?' या 'ई' बुकचे प्रकाशन करण्यात आले.

माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. उदय माहुरकर म्हणाले की, सध्या सोशल मीडिया, 'ओटीटी', चित्रपट यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक आक्रमण होत आहे. पॉर्नोग्राफीमुळे बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. हा राक्षस मोबाईलच्या माध्यमातून आता घराघरांत पोहोचला आहे. सनातन संस्कृती, पुढील पिढी वाचण्यासाठी हे सांस्कृतिक आक्रमण रोखणे आवश्यक आहे. तर चंडीगढ येथील लेखक आणि विचारवंत श्री. नीरज अत्री म्हणाले की, सध्या समाजात पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करण्यात अनेक जण धन्यता मानत आहेत. सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी हिंदूंच्या डोक्यावर बसलेले पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणाचे भूत उतरवणे आवश्यक आहे.

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे श्री. रमेश शिंदे म्हणाले की, बांगलादेशात सरकारविरोधी आंदोलनात हिंदूनाच मारण्यात आले. काश्मीर, केरळ आणि बंगाल येथून हिंदूच संपत चालले आहेत. नुकत्याच पहलगाम येथेही धर्म विचारून हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. प्रत्येक ठिकाणी हिंदूनाच लक्ष्य केल्या जात आहे. त्यामुळे आता केवळ जागृती करत बसण्यापेक्षा त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. समर्थ रामदासस्वामींनी यांच्याप्रमाणे आज आपले संत जागृती करत असल्याने आपल्यालाही या सनातन राष्ट्र शंखनादाच्या माध्यमातून सनातन राष्ट्राच्या स्थापनेसाठी लढण्यासाठी सिद्ध व्हावे लागेल.

## दहशतवादी आमिर हमजावर गोळीबार; हल्ल्यात गंभीर जखमी

इस्लामाबाद : बंदी घालण्यात आलेली दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा सहसंस्थापक आमिर हमजा लाहोरमध्ये राहत्या घराजवळ झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाला असून लाहोरमधील रूग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, त्याच्यावर गोळीबार झाल्याचीही चर्चा आहे. या घटनेने पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. मात्र, पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या घटनेबाबत मौन बाळगले आहे. प्राथमिक माहितीनुसार, हमजा आपल्या लाहोरमधील निवासस्थानी अपघातात जखमी झाला असून, त्याला तत्काळ स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्याच्यावर गंभीर दुखापतीमुळे उपचार सुरू आहेत. सोशल मीडियावर चर्चेत असलेल्या वृत्तांनुसार, हमजावर गोळीबार झाला असा दावा करण्यात आला होता. मात्र, घटनास्थळी तपास केल्यानंतर या दाव्यांचे खंडन करण्यात आले असून, अधिकृत सूत्रांनी घटनास्थळी गोळीबाराचे कोणतेही ठोस पुरावे आढळले नसल्याचे सांगितले आहे. तरीही, हा अपघात नेमका कसा घडला, याबाबत स्पष्टता नाही, त्यामुळे घातपाताची शक्यता अजूनही पूर्णतः नाकारलेली नाही. अमेरिकेच्या ट्रेझरी डिपार्टमेंटने लष्कर-ए-तोयबाला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले असून, आमिर हमजाला देखील नामांकित दहशतवाद्यांच्या यादीत समाविष्ट केले आहे.त्याने लष्कर ए तोयबाच्या केंद्रीय समितीमध्ये काम केले असून, निधी उभारणी, भरती आणि अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांच्या सुटकेसाठी वाटाघाटी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २०१८ मध्ये, लष्करशी संबंधित जमात-उद-दावा आणि फलाह-ए-इन्सानियत फाऊंडेशन या संस्थांवर पाकिस्तान सरकारने आर्थिक निर्बंध घातल्यानंतर हमजाने लष्कर-ए-तोयबापासून स्वतःला दूर केल्याचे सांगितले जाते.त्यानंतर त्यांनी जैश-ए-मनकफा नावाची वेगळी संघटना स्थापन केली, जी जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया चालू ठेवण्यासाठी असल्याचा आरोप आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धाराशिव शहर पोलीसांची जुगार विरोधात कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मे -**

धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने जुगार विरोधात केलील्या कारवाईत एका इसमावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दि. २० मे २०२५ रोजी सायंकाळी ८.३० वाजता सुमारास धाराशिव शहर पोलीसांनी साठे चौक ते तुळजापूर जाणाऱ्या रोडच्या डाव्या बाजूस, आडत लाईनजवळ छापा टाकला.

या कारवाईदरम्यान आरोपी बबन गोरोगा तट (वय ३७, रा. तुळजापूर नाका, धाराशिव) हा मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य आणि एकूण १,१२० रुपयांची रोकड स्वतःच्या ताब्यात ठेवून जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले.



पोलिसांनी घटनास्थळी उपस्थित राहून जुगाराचे साहित्य व रोकड जप्त केली असून, आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अंतर्गत धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### तेरमध्ये मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस

**तेर, दि.२१ मे -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे बिगर मोसमी अवकाळी मेघगर्जनेसह पाऊस कोसळला. (दि.२१) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास १ तास पावसाने हजेरी लावली असून सखल भागात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी शिरले झाले. मेघगर्जनेसह पाऊस पडला असुन नागरिकांची धावपळ उडाली व सगळीकडे पाणी साचले आहे. पुढील चार ते पाच दिवस नागरिकांनी आपापली काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## धाराशिव जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपले

**जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी पावसाची हजेरी | घरांची पडझड, वीजपुरवठा खंडित | पावसाने नागरिकांची उडाली तारांबळ | वीजपुरवठा खंडी, झाडे उन्मळून पडली**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मे -**

आज (दि.२१) व काल, मंगळवार (दि. २० मे) रात्रीपासून धाराशिव जिल्ह्यावर अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला असून, जोरदार वादळी वाऱ्यासह पडलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. लोहारा, कळंब, भूम, वाशी आणि उमरगा या तालुक्यांमध्ये विशेषतः मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे.

मंगळवारी रात्रभर सुरू असलेल्या वादळात पत्र्याची घरे उडून गेली असून, अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत.

काही भागांत झाडे उन्मळून पडल्याने आणि विजेचे खांब कोसळल्याने वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला आहे. परिणामी नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ग्रामीण भागांत याचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत आहे.

भूम तालुक्यातील सुकटा गावात वीज पडून एका शेतकऱ्याची गाय जागीच मृत्युमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अनेक भागांतील रस्त्यांवर झाडे आणि पत्रे अडथळा निर्माण करत असल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. पावसामुळे स्थानिक बाजारपेठा, छोटे उद्योग आणि व्यापाऱ्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अवकाळी पावसामुळे खरीप हंगामासाठी जमिनीची तयारी करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.

आज (दि.२१) दुपार पासूनही जिल्ह्यात जोरदार पावसाची स्थिती कायम आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार हा पाऊस रात्रभर सुरू राहण्याची शक्यता आहे. प्रशासनाकडून सतत संपर्क ठेवून मदतीचे प्रयत्न सुरू आहेत.

पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन पीडितांना तातडीने मदत मिळावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पुढील पाच दिवस सतर्कतेचा इशारा...

हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी वादळी वाऱ्यासह मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाचा इशारा दिला आहे. वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किलोमीटरपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामुळे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, विशेषतः शेतकरी, छोटे दुकानदार आणि शहरातील रहिवाशांनी सुरक्षित ठिकाणी थांबावे, असे सूचित करण्यात आले आहे.

## उमरग्यात पतीसह सासरच्या लोकांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

**गंभीर आजार लपवून विवाह करून केली फसवणूक...**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ मे -**

उमरगा पोलीस ठाण्यात एका महिलेची वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी श्रद्धा हर्षल भावसार (वय ३२, रा. पुणे, ह.मु. गुंजोटी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी हर्षल अरुण भावसार (वय ३३), मंजुश्री अरुण भावसार (वय ६०), वैशाली रविनंदन भावसार (वय ३८), रविनंदन सुभाष भावसार (वय ४३), सर्व रा. बलेजा ९ फ्लोअर ब्लॉक नं. २, इंदिरा कॉलेज रोड, वाकड, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी संगनमत करून फसवणूक केली.

दि.२८ नोव्हेंबर २०२२ पासून गुंजोटी येथे वस्ती करत असलेल्या फिर्यादीसोबत आरोपी हर्षल याचे लग्न लावण्यात आले. मात्र, त्याने आणि त्याच्या कुटुंबीयांनी हर्षलचा गंभीर आजार असल्याची माहिती जाणीवपूर्वक लपवली. खोटी माहिती देऊन विवाह लावून घेतला आणि श्रद्धा तसेच तिच्या पालकांची फसवणूक केली.

या प्रकरणी मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरगा यांच्या आदेशानुसार दि.१७ मे रोजी भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ४०६ (विश्वासघात), ४१५ (फसवणुकीची व्याख्या), ४१७ (फसवणूक), ४२० (फसवणुकीने मालमत्ता मिळवणे) व १२०(ब) (संगनमत) अन्वये गुन्हा उमरगा पोलीस ठाण्यात दि.२० मे २०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून, या प्रकरणामुळे गुंजोटी परिसरात चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नवरदेवाची हरवलेली सोन्याची अंगठी सुरक्षा रक्षकांकडून भाविकांच्या स्वाधीन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मे -**

नुकतेच लग्न झाल्यानंतर देवीच्या दर्शनासाठी आलेल्या नवरदेवाची हरवलेली सोन्याची अंगठी सुरक्षा रक्षकाने सुखरूप परत केली. अर्ध्या तोळ्याहून अधिक म्हणजेच जवळपास ५० हजार रुपयांची मौल्यवान अंगठी मंदिरातील सतर्क व्यवस्थेमुळे परत मिळाल्यामुळे भाविकाने समाधान व्यक्त करत मंदिर संस्थानचे आभार मानले.



यशवंत पाटील हे धारशिवच्या परांडा जिल्ह्यातील वाकडी गावचे रहिवासी असलेले भाविक श्रीतुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी आले असता त्यांची अंगठी हरवली. दर्शन मंडपातील पहिल्या मजल्यावर सुरक्षा रक्षक भोजने रोहन यांना खाली जमिनीवर पडलेली सोन्याची अंगठी सापडली असता त्यांनी ती दर्शन मंडप नियंत्रण कक्ष येथे जमा केली. अंगठी हरविल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित भाविकाने मंदिर संस्थानच्या सुरक्षा विभागाकडे चौकशी केली असता त्यांना दर्शन मंडप नियंत्रण कक्ष येथे पाठविण्यात आले. तेव्हा त्यांची ओळख पटवून आणि शहानिशा करून त्यांना अंगठी परत देण्यात आली.

यावेळी मंदिरचे रोखपाल महेंद्र आदमाने, सुरक्षा निरीक्षक श्रीकांत पवार, प्रोजेक्ट मॅनेजर संग्राम पाटील, सुरक्षा सुपरवायझर योगेश फडके, प्रशांत अलकुंटे, अनिल लोखंडे इत्यादी उपस्थित होते.

## तुळजापूरमध्ये किरकोळ वादातून तरुणावर हल्ला; तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मे -**

तुळजापूर शहरातील मलबा कॉर्नर दुर्वा वडापाव दुकानासमोर किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर हल्ला करण्यात आला. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि.१६ मे रोजी रात्री ११ वाजता फिर्यादी प्रेम लाल पवार (वय १८, रा. धाकट तुळजापूर, ता. तुळजापूर) हे दुर्वा वडापाव दुकानाजवळ असताना आरोपी बप्पा रुपनर, पिंटु रुपनर आणि इतर एक (रा. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी फिर्यादीच्या अंगावर चुळ भरल्याचे पाणी पडल्याच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व काठी, पिवळ्या पाईपाने मारहाण केली.

या हल्ल्यात प्रेम पवार जखमी झाले असून, आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी प्रेम पवार यांनी २० मे रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यावरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## खुनाचा ४८ तासांत उलगडा; एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२१ मे -**

मुरुम पोलीस ठाणे हद्दीतील दस्तापूर परिसरात दि.१९ मे रोजी सकाळी एक बोलेरो जीप महामार्गावर उभी असल्याचे आढळून आले. या गाडीच्या शेजारी एका इसमाचा मृतदेह पडलेला दिसून आला. पोलीस घटनास्थळी दाखल होताच मृत इसमाची ओळख पटली असून तो शमशुद्दीन मियासाहेब पटेल (रा. दाळिंब, ता. उमरगा) असल्याचे स्पष्ट झाले.

प्रथमदर्शनी पाहता मृत व्यक्तीवर डोक्यात दगड टाकून हत्या केल्याचे निदर्शनास आले. परंतु आरोपीची ओळख पटवणे अत्यंत आव्हानात्मक ठरत होते. सततचा पाऊस



आणि वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे तपास कार्यात अडथळे निर्माण होत होते. तथापि, स्थानिक गुन्हे शाखा व मुरुम पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी अथक प्रयत्न करून केवळ ४८ तासांत या गुन्ह्याचा छडा लावण्यात यश मिळवले.

तांत्रिक विश्लेषण आणि परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून पोलिसांनी अत्यंत कौशल्याने या गुन्ह्याचा उलगडा केला. या प्रकरणात दाळिंब येथील दोन युवकांचा सहभाग असल्याचे उघड झाले असून, त्यापैकी एक आरोपी ज्ञानेश्वर भोळे यास तुगाव येथून अटक करण्यात आली आहे. चौकशीत त्याने जुना वाद असल्यामुळे खून केल्याची कबुली दिली आहे.

या यशस्वी कारवाईसाठी सदाशिव शेलार (उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरगा), पोनि. विनोद ईज्जपवार, सपोनि. संदीप दहीफळे, सपोनि. अमोल मोरे, पोअं. सचिन खटके, विनोद जानराव, बबन जाधवर, नितीन जाधवर, जावेद काझी, दयानंद गादेकर, समाधान वाघमारे, चालक विजय घुगे, सुभाष चौरे यांनी संयुक्तरीत्या केली.

## जयप्रकाश विद्यालयास दोन लाखाचा धनादेश प्राप्त



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मे -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर ता. धाराशिव यांना मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावल्याबद्दल २,००,००० रु. (अक्षरी दोन लाख रु.) धनादेश प्राप्त झाला आहे.

सन २०२४-२५ महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबवण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाद्वारे जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावल्या मुळे रोख रकमेचा दोन लाख रुपये धनादेश विद्यालयास प्राप्त झाला असून यामुळे या रकमेतून विद्यालयाच्या भौतिक सुविधा वाढण्यास हातभार लागणार आहे.

आज रोजी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे यांच्याकडून प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्याकडे दोन लाखाचा धनादेश सुपूर्त करण्यात आला आहे.

सदरील रक्कम प्राप्त झाल्याने परिसरातील नागरिकात व कर्मचाऱ्यात उत्साहाचे वातावरण आहे.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे, माजी ग्राम पंचायत सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह आदि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान २.०

## विभागीय तपासणी समितीची औराद, घाटनांदूर गावाला भेट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मे -**

संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान २.० अंतर्गत जिल्ह्यातील निवडक गावांची पाहणी करण्यासाठी विभागीय तपासणी समिती जिल्हयात आली होती. या समितीने जिल्ह्यातील दोन गावांना भेटी दिल्या.

विभागीय तपासणी समितीमध्ये सहायक आयुक्त (विकास) तथा सदस्य सचिव उद्धव होळकर, सहायक आयुक्त (विकास), आस्थापना दिलीप गुमरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांचे प्रतिनिधी वसंत पोतदार, संचालक माहिती व जनसंपर्क विभागीय कार्यालयाचे प्रतिनिधी नंदु पवार, स्वच्छता मिशनचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी हनुमंत गादगे, आदींनी पाहणी केली.

उमरगा तालुक्यातील औराद व भूम तालुक्यातील घाटनांदूर या गावांना भेट दिली. ग्रामस्वच्छतेच्या अनुषंगाने गावांची प्रगती, स्वच्छता उपाययोजना व ग्रामस्थांचा सहभाग याची समितीने पाहणी केली. समितीमध्ये महसूल, आरोग्य, पाणीपुरवठा,



पंचायत राज आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी सहभागी होते. समितीने गावांतील सार्वजनिक शौचालये, गटारी व्यवस्थापन, कचऱ्यांची विलगीकरण व्यवस्था, जलसंवर्धन, हरितभिंती, भिंती चित्रण, वस्ती स्वच्छता इत्यादी बाबींचा आढावा घेतला.

औराद गावात ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने गावातील ओला-सुका कचरा वेगवेगळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था पाहण्यात आली. तसेच, लोकसहभागातून सुरू असलेल्या स्वच्छता मोहीमेमुळे गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे व अंगणवाडी परिसर स्वच्छ आढळले.

घाटनांदूर गावातही स्वच्छतेच्या बाबतीत उल्लेखनीय कार्य दिसून आले. ग्रामस्थांनी घराघरातून कचरा संकलन, जलसंवर्धनासाठी बांधलेली पाणी टाकी व गटारींची स्वच्छता नियमितपणे केली जात जातेय का याची पाहणी केली. पाहणी दरम्यान समितीने गावकऱ्यांशी स्वच्छतेबाबत संवाद साधला. गावकऱ्यांनी देखील सरकारकडून मिळणाऱ्या योजनांचा योग्य लाभ घेत गावाचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या पाहणीमुळे संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान २.० अंतर्गत गावांनी स्वच्छतेच्या दिशेने घेतलेली पावले आणि लोकसहभागातून निर्माण झालेली सकारात्मक ऊर्जा अधोरेखित झाली. विभागीय समिती पाहणी अहवाल शासनाकडे सादर करणार असून,उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना जिल्हास्तरावर गौरवण्यात येणार आहे.

यावेळी औरादचे सरपंच सुशील जाधव, उपसरपंच रमेश कारभारी, ग्राम सेवक एस.पी.नंदरगे, घाटनांदुरचे सरपंच रावसाहेब बंदवान, उपसरपंच खेलदेव बेरगळ, ग्रामसेवक एस.जी. नागटिळक यांच्यासह औरद व घाटनांदुर गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## कुत्र्याच्या वादातून कानेगावात महिला व मुलावर काठी हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२१ मे -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव शिवारात किरकोळ कारणावरून वाद होऊन एका महिलेसह तिच्या मुलावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.१९ मे रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता, कानेगाव शिवारातील गट क्रमांक ११५/२ मध्ये फिर्यादी सविता साहेब करंडे (वय ६०) व त्यांचा मुलगा संतोष करंडे हे शेतामध्ये असताना, आरोपी गोपाळ अर्जुन कदम (रा. कानेगाव, ता. लोहारा) याने कुत्र्याला दगड मारल्याच्या कारणावरून वाद घालून शिवीगाळ केली. त्यानंतर संतप्त होऊन त्याने फिर्यादी आणि तिच्या मुलास लाथाबुक्क्यांनी तसेच कुदळीच्या दांड्याने मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली.

सविता करंडे यांनी याबाबत २० मे रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून याबाबत अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## पीक विमा योजनेतील १३१३ कोटी रुपये त्वरित वसूल करा

**पीकविमा याचिकाकर्ते अनिल जगताप यांची मुख्यमंत्र्यांकडे ईमेलद्वारे मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मे -**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेतील ८०-११० मॉडेल नुसार पिक विमा कंपनीकडून राज्य शासनाला येणे प्रलंबित असलेली १३१३ कोटी रुपये रक्कम पिक विमा कंपनीकडून त्वरित हवसूल करावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पीक विमा याचिका करते अनिल जगताप यांची ईमेल निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

राज्य शासनाने सन २०२० २१ पासून राज्यात ८०-११० चे मॉडेल स्वीकारले असून ते बीड पॅटर्न म्हणून देखील प्रसिद्ध आहे. या मॉडेल द्वारे पिक विमा कंपनीकडून राज्य शासनाला किती परतावा रक्कम येणे बाकी आहे व ११० टक्के पुढील पिक विमा कंपनीला किती रक्कम देणे बाकी असले बाबत कृषी आयुक्त पुणे यांच्याकडे अनिल जगताप यांनी माहिती मागवली होती त्यांना दिलेल्या माहितीत १३१३ कोटी रुपये पिक विमा कंपन्याकडून येणे बाकी असल्याची धक्कादायक माहिती आहे तर राज्य शासन ११० टक्केच्या पुढील केवळ २४७ कोटी रुपये रक्कम देणे बाकी आहे.

८०-११० मॉडेल नुसार जर एखाद्या कंपनीला १०० कोटी रुपये हप्ता दिला गेला असेल व कंपनीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई ७५ कोटी रुपये दिली गेली असल्यास २० टक्के अर्थात वीस कोटी रुपये कंपनी स्वतःकडे ठेवून घेते व पाच टक्के अर्थात पाच कोटी रुपये कंपनीला राज्य शासनाला परत करावे लागतात. तसेच राज्य शासनाकडून शंभर कोटी रुपये कंपनीला हप्ता असल्यास ११० कोटी रुपये नुकसान भरपाई झाली तर दहा टक्के कंपनीला स्वतःचे घालून ११० कोटी रुपये शेतकऱ्यांना द्यावे लागतात तसेच नुकसान भरपाई जर ११० टक्क्यांच्या पुढे असल्यास पुढील रक्कम राज्य शासन देते.

सन २०२०-२१ ते २३-२४ रब्बी पर्यंत ८०-११० मॉडेल नुसार राज्य शासनाला विविध पीक विमा कंपन्याकडून परतावा रक्कम अपेक्षित ३४०३ कोटी ५२ लाख इतकी होती त्, यातील २०९० कोटी २६ लाख रुपये प्राप्त झाले असून अद्यापही विविध पीक विमा कंपन्याकडे कंपनीकडे प्रलंबित १३१३ कोटी २६ लाख रुपये येणे बाकी आहे असल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे.



८०-११० मॉडेल नुसार विमा कंपनीला ११० टक्क्यांपेक्षा राज्य शासन जास्तीची नुकसान भरपाई रक्कम २४०५ कोटी ८९ लाख इतकी होती त्यातील २१५८ कोटी लाख रुपये वितरित केली गेली असून अद्याप २४७ कोटी रुपये पिक विमा कंपनीला वितरित करणे बाकी आहे.

पिक विमा कंपनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना हात आकडता घेते मात्र राज्य शासनाची पिक विमा कंपनीकडे पिक विमा हप्त्याच्या माध्यमातून दिली गेलेली व अडकून पडलेली मोठी रक्कम राज्य शासनाने त्वरित वसूल करणे गरजेचे आहे. व त्या रकमेची वसुली त्वरित पिक विमा कंपनीकडून करावी अशी विनंती, अनिल जगताप यांनी निवेदनात केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जस्टडायलतर्फे छत्रपती संभाजीनगर इथल्या व्यवसायांच्या विकासासाठी मोठे योगदान

छत्रपती संभाजीनगर, पूर्वीचे औरंगाबाद शहर इथली संस्कृती, इतिहास आणि उद्योगांसाठी ओळखलं जातं. छत्रपती संभाजी महाराजांच्या सन्मानार्थ ठेवण्यात आलेल्या या नावाला साजेशा या शहरात वारसा आणि आधुनिकता यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. अंजठा आणि एलोरा लेण्यांसारखी ऐतिहासिक स्थळं आणि कॉटन टेक्स्टाइलचे मोठे उत्पादन केंद्र व कलात्मक सिल्क कापड यांच्यासाठी हे शहर ओळखलं जातं. गेल्या काही वर्षांत हे शहर शिक्षण, उत्पादन आणि पर्यटनाचं उद्योन्मुख केंद्र म्हणून उदयास येत असून पर्यायाने मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला हातभार लावला जात आहे. जास्तीत जास्त स्थानिक व्यवसाय नव्या ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी विस्तार करण्यासाठी उत्सुक असून त्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म आवश्यक झाले आहेत. जस्टडायल हे भारतातील आघाडीचे स्थानिक पातळीवरील सर्च इंजिन छत्रपती संभाजीनगरमधील व्यवसायांना मदत करण्यात महत्त्वाची भूमिक बजावत आहे. ३ लाखांपेक्षा जास्त नोंदणीकृत व्यवसाय आणि फक्त शहर भागातील सध्याचे ३७०० पेड व्हेंडर्स यांसह जस्टडायल स्थानिक उद्योजक व एमएसएमईजना वेगवेगळ्या ठिकाणच्या ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत करत आहे.

## एक्झोनोबेल इंडिया तर्फे 'ड्युलक्स मास्ट्रो' प्रोग्राम सादर

छत्रपती संभाजीनगर- आघाडीची जागतिक पेंट्स आणि कोटिंग्स कंपनी आणि ड्युलक्स पेंट्सची निर्माती एक्झोनोबेल इंडिया ने 'ड्युलक्स मास्ट्रो' या नावाने भारतातील आर्किटेक्ट्स आणि डिझायनर समुदायाला सक्षम बनवण्यासाठी एक्झोनोबेल ची एक विशेष इकोसिस्टम सादर करत असल्याची घोषणा केली आहे. आजच्या 'नया भारत' साठी आधुनिक वास्तू आणि निवासस्थळांना आकार देत असलेल्या व्यावसायिकांना यामुळे मदत होईल. नुकत्याच झालेल्या एका बाजरपेठीय अभ्यासानुसार* भारतीय इंटेरियर डिझाइन बाजारपेठेचा विकास दर १४.३% इतका असून तो २०३० पर्यंत ८१.२ अब्ज अमेरिकन डॉलर इतका पोहोचेल असा अंदाज आहे. २०५० पर्यंत भारतातील शहरीकरण ५०% च्या पुढे जाण्याची शक्यता आहे आणि त्यासोबत विशेषतः टियर २ आणि टियर ३ शहरांमध्ये निवासासाठी सानुकूल आणि व्यक्तिगत राहण्यासाठी जागेची मागणी झपाट्याने वाढत आहे,.

## ९ पॉईंट कॅपिटलचा वितरण कार्यक्रम

पुणे : ९पॉईंट कॅपिटलने १६ मे २०२५ रोजी पुण्यात आपला पहिला अधिकृत गुंतवणूकदार व वितरक कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम त्यांच्या राष्ट्रीय विस्तार प्रवासातील एक मोठा टप्पा होता, ज्याचा उद्देश कायदेशीरदृष्ट्या सुसंगत डिजिटल मालमत्ता उपाय वितरक व गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचवणे, विशेषतः एचएनआय व यूएचएनआय वर्गासाठी. ही सुरुवात भारतातील व्यापक वित्तीय समुदायांपर्यंत नवकल्पनांचा प्रसार करण्याच्या दृष्टीने झाली.या कार्यक्रमात वित्तीय वितरक, सुरुवातीचे भागीदार आणि सल्लागार सहभागी झाले होते. उपस्थितांना ९पॉईंट कॅपिटलच्या मूलतत्त्वांचा आणि तंत्रज्ञानाधारित डिजिटल मालमत्ता व्यवस्थापन दृष्टिकोनाचा सखोल परिचय देण्यात आला. नेतृत्व पथकाने पारदर्शक, सुसंगत, विमा-संरक्षित व नियामकदृष्ट्या सुरक्षित डिजिटल गुंतवणूक उपायांची ठोस योजना सादर केली-विशेषतः प्रगत गुंतवणूकदारांसाठी. हा कार्यक्रम नवीन भागीदार प्रणालीची सुरुवात होती, जिथे ९पॉईंट कॅपिटल आधुनिक, संशोधनाधारित व कर-बचतक्षम उपाय सादर करतो.

## बिट्टू बहानेबाज'सह हास्य व कल्पनाशक्तीच्या विश्वाचा अनुभव घ्या

पुणे- सर्जनशीलता, विलक्षण कारणे आणि धमाल क्षण एकत्र येतात तेव्हा काय घडते? तुम्हाला पाहायला मिळेल 'बिट्टू बहानेबाज'मध्ये! जिओस्टार किड्स या किड्स एंटरटेन्मेंटमधील आघाडीच्या चॅनेलने त्यांचा नवीन शो 'बिट्टू बहानेबाज'मध्ये कारणे सांगण्यामध्ये मास्टर असलेल्या १० वर्षीय मुलाच्या संबंधित कहाणीला सादर केले आहे. हा शो सध्या दररोज दुपारी १२.३० वाजता सोनिकवर प्रसारित होतो, तसेच सकाळी ९ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता पुनर्प्रसारित होण्यासोबत त्याच दिवशी जिओहॉटस्टारवर देखील प्रसारित होतो. हा शो १० वर्षांचा हुशार आणि चतुर बिट्टूच्या साहसावर आधारित आहे, जो नेहमीच रोजच्या आव्हानांमधून बाहेर पडण्यासाठी विनोदी आणि कल्पनारम्य सबबी सांगत असतो. विनोद आणि दैनंदिन जीवनातील संबंधित क्षणांनी परिपूर्ण ही सिरीज आपल्या सर्वांमधील खेळकर बाजूला सादर करते, जेथे प्रत्येकामध्ये थोडासा बिट्टू असतोच! नियम बदलतात आणि सर्जनशीलता जिंकते अशा विश्वामध्ये बिट्टूच्या कृत्यांमुळे लहान मुले आणि कुटुंबातील सर्व सदस्यांचे मनोरंजन होईल हे निश्चित आहे.

## सिनेमामधील अग्रगण्य सिताऱ्यांनी सादर केले आपले जबरदस्त लूक्स

आता प्रकाशाचा झोत पुन्हा एकदा भारतीय सिनेमाकडे वळला आहे - झी ने आकर्षक मारूती सुझुकी प्रस्तुत २३ वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२५ चे आयोजन करून भारतीय सिनेमामधील सितारे, कथा आणि चैतन्याला एकत्र आणत गेल्या वर्षासाठीचे भव्य सेलिब्रेशन साजरे केले. ह्यावर्षी मंच केवळ सिताऱ्यांसाठी राखीव नव्हता तर तो तेवढाच चाहत्यांसाठीही होता. सर्वांत मोठ्या फॅन्टरटेनमेंट नाईट ऑफ दि यरमध्ये ह्या संध्येमध्ये स्टारडम आणि फॅनडम यांचा रोमांचक संगम दिसून आला, ज्यामध्ये जे सिनेमा निर्माण करतात आणि जे त्याचा आनंद लुटतात असे सगळेच एका छताखाली ह्या जादूचा आनंद लुटण्यासाठी एकत्र आले. मुंबईच्या एनएससीआय डोम येथे आयोजित करण्यात आलेल्या ह्या कार्यक्रमामध्ये प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या, उच्चांक निर्माण करणाऱ्या आणि सिनेमाची जादू पुन्हा प्रस्थापित करणाऱ्या सिनेमॅटिक वर्षाला आदरांजली वाहण्यात आली.

## बुद्धीचातुर्याबरोबरच आकर्षक शोध आणि वेधक कथाकथन

सोनी सबवरील 'तेनाली रामा' ही लोकप्रिय ऐतिहासिक मालिका आता एक नवे वळण घेऊन प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणार आहे. आधुनिक साधने उपलब्ध नसताना आणि फॉरेन्सिक प्रगती न झालेल्या काळातल्या या मालिकेत तेनालीचे बुद्धीचातुर्य, विनोदबुद्धी आणि सूज्ञपणा तसाच राखून कथानकात थरारक रहस्य आणि शोध गुंफल्यामुळे मालिका अधिकच आकर्षक होणार आहे.कथानकातील हा बदल प्रामुख्याने दोन नवीन पात्रांच्या एंट्रीमुळे दिसून येईल. यापैकी कुणाल करण कपूर लक्ष्मणाप्पाची भूमिका करत आहे, तर निखिल आर्य कोतवाल ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. तेनालीच्या रूपात कृष्ण भारद्वाज आणि या दोन नव्या पात्रांचे मिळून जे त्रिकुट तयार होत आहे, त्यामुळे मालिकेत एक वेगळी ऊर्जा आणि समन्वय दिसून येईल.

## सोनी सबवर 'उफ्फ ये लव है मुश्किल

टीव्हीवरची सगळ्यांची आवडती आई सुप्रिया शुक्ला छोट्या पडद्यावर पुनरागमन करत आहे, पण यावेळी त्यात एक छोटासा मस्त ट्विस्ट आहे. सोनी सबवरील 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' या आगामी मालिकेत सुप्रिया शुक्ला इंद्राणी म्हणजे युगच्या आईच्या भूमिकेत दिसणार आहे. नेहमीच्या सास-बहू ड्रामापेक्षा ही अगदी वेगळी भूमिका आहे. या व्यक्तिरेखेने तिला स्वतःमधील नवीन बाजू शोधण्याची संधी दिली आहे.

## जर मी ऑन-स्क्रीन चहावाला बनत असेल, तर ऑफ-स्क्रीन का नाही!

झी टीव्हीवरील 'जमाई नं. १'मध्ये एक भावस्पर्शी ट्विस्ट पाहायला मिळाला जेव्हा नील (अभिषेक मलिक) आपल्या ऑन-स्क्रीन पत्नी रिद्धी (सिमरन कौर) ला प्रभावित करण्यासाठी चहावाल्याच्या रूपात समोर आला. एका खास आणि जुनी आठवण जागी करण्यासाठी नील रिद्धीला एका 'टपरी डेट'वर घेऊन जातो, जिथे तो चहावाला बनून तिला चहा सर्व्ह करतो. यात एक साधा वाटणारा चहा त्याने प्रेम आणि आठवणींचे प्रतीक बनवला. पण जे खरे खास होते, ते पडद्यामागे घडले!

# संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज राहावे - जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



अहिल्यानगर, दि. २० : मान्सून कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज राहावे. संभाव्य आपत्तीच्या काळात सर्व विभागाचे अधिकारी समन्वयाने कार्य करत, कोणीही पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील हे प्रत्यक्ष उपस्थित होते; तर शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व संबंधित यंत्रणांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मान्सून कालावधीत पूर अथवा वादळामुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची शक्यता असते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सर्वोतोपरी सज्ज राहावे. पूरपरिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी सुरक्षित निवाऱ्यांची पाहणी करून त्याचे सूक्ष्म नियोजन करावे. त्या ठिकाणी अन्नधान्य, पाणी, औषधी आदींची पुरेशी व्यवस्था असावी. जिल्ह्यातील विविध पाणी साठवण प्रकल्प, साठवण तलाव, पाझर तलाव यांची पाहणी करून ते सुस्थितीत असल्याची खात्री करावी. आपत्तीच्या काळात विद्युत पुरवठा व दूरध्वनी सेवा अखंडित सुरू राहील, यासाठी संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. पूरप्रवण व तलाव क्षेत्रामध्ये गाव-शोध व बचाव पथकांची व्यवस्था चोख ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या पुलांचे सर्वेक्षण करावे. धोकादायक पुलांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती कारवाई करावी. दरड कोसळणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून तेथे चेतावणी फलक लावावेत. झाडे रस्त्यावर उन्मळून पडून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. पुरामुळे पाणीपुरवठा योजना बाधित होणार नाहीत, याची दक्षता घेण्याबरोबरच पूरपरिस्थितीत सातत्याने पाण्याचे नमुने तपासावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

मान्सून कालावधीत पसरणाऱ्या साथीच्या रोगांपासून बचाव करण्यासाठी तसेच रोगराई पसरल्यास निदानासाठी उपाययोजना आखून ठेवाव्यात. प्रत्येक शासकीय रुग्णालयात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असावा. शोध व बचाव साहित्यांची तपासणी करून काही बिघाड असल्यास ते तातडीने दुरुस्त करावे. जिल्ह्यातील धोकादायक शाळा खोल्या व अंगणवाड्यांचा वापर होऊ नये. आपत्तीच्या काळात २४७ नियंत्रण कक्ष सुरू राहील, याची दक्षता घ्यावी. महानगरपालिका व नगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक ती कारवाई करावी. शहरांमध्ये ड्रेनेज अडथळ्यांमुळे अनेक वेळा पाण्याचा निचरा होत नाही, त्यामुळे ड्रेनेजची तातडीने दुरुस्ती करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

# औषधी व सुगंधी वनस्पती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी अर्ज करावेत

अहिल्यानगर, दि. २१ - औषधी व सुगंधी वनस्पती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी ारहरवलींरहरळीं. सेीं.ळप या महाडीबीटी पोर्टलवर फलोत्पादन घटकांतर्गत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत औषधी व सुगंधी वनस्पती लागवड हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. सन २०२५-२६ साठी ४ कोटी ४० लाख रुपयांच्या वार्षिक आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे.

मुलेठी, शतावरी, कालीहारी, कळलावी, सफेद मुसळी, गुग्गुळ, मंजिष्ठा, कुटकी, अतिस, जटामासी, अश्वगंधा, ब्राह्मी, तुलसी, विदारीकंद, पिंपळी, चिराटा व पुष्करमूळ या औषधी वनस्पतीच्या लागवडीसाठी प्रती हेक्टर १ लाख ५० हजार रुपयांचा मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे. लागवड साहित्य व आयएनएम, आयपीएमचा खर्च २ हेक्टरच्या मर्यादेत २ आठवड्यांमध्ये देय आहे.

गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जिरेनियम, कॅमोमाईल, चंदन, दवणा, जाई व लॅव्हेंडर या महत्त्वाच्या सुगंधी वनस्पतींच्या लागवडीसाठी प्रती हेक्टर १ लाख २५ हजार रुपयांचा मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे. लागवड साहित्य व आयएनएम, आयपीएमचा खर्च २ हेक्टरच्या मर्यादेत २ आठवड्यांमध्ये देय आहे.

इतर सुगंधी वनस्पतींमध्ये पामरोसा, गवती चहा, तुळस, व्हेटीव्हर, जावा, सिट्रोनेला, गोड तुळशीपत्र यांच्यासाठी ५० हजार रुपयांचा मापदंड असून, सर्वसाधारण क्षेत्रामध्ये ४० टक्के व अधिसूचित क्षेत्रामध्ये ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे. लागवड साहित्य व आयएनएम, आयपीएमचा खर्च २ हेक्टरच्या मर्यादेत २ आठवड्यांमध्ये देय आहे.

## मसापमध्ये डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनानिमित्त शोकसभा

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी पुणे येथे निधन झाले. ते फक्त शास्त्रज्ञ नव्हते, तर लेखक म्हणूनही ते श्रेष्ठ होते. त्यांनी लिहिलेल्या विज्ञान कथा, कादंबऱ्या हे मराठी साहित्य कायमचे अजरामर आहे. प्रेषित, अंतराळातील भस्मासूर, अंतराळातील स्फोट, अभयारण्य, चला जाऊ अवकाश सफरीला, आकाशाशी जडले नाते, वामन परत न आला, गणितातील गमती जमती, नभात हसले तारे इत्यादी त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

याशिवाय पद्मभूषण, पद्मविभूषण महाराष्ट्रभूषण, साहित्य अकादमी इत्यादी पुरस्काराने त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांनी मांडलेला 'हॉयल नारळीकर सिद्धांत' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मानला जातो.

नारळीकर यांच्या निधनाने खगोलीय क्षेत्रात आणि वैज्ञानिक कथा, कादंबरी क्षेत्रात निर्माण झालेली पोकळी भरून येणे अत्यंत कठीण आहे. त्यांच्या निधनाच्या निमित्ताने मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने त्यांना गुरुवारी, २२ मे २०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता मराठवाडा साहित्य परिषदेच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात शोकसभा आयोजित करण्यात आली आहे.

या शोकसभेत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल. या शोकसभेस सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महात्मा फुले जन आरोग्य योजना गरिबांसाठी वरदान - आ. अब्दुल सत्तार



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२०, शहरातील सोनार रुग्णालय येथे सुरू करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या पंतप्रधान आयुष्मान भारत आणि राज्य सरकारच्या आरोग्य योजनेअंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे उद्घाटन आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.

जन आरोग्य योजने अंतर्गत, पालकांना त्यांच्या मुलांवर सिल्लोड येथे आता सरकारी खर्चाने सोनार या खाजगी रुग्णालयात उपचार घेता येणार असल्याने रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी केले. सर्वसामान्य कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांअंतर्गत सिल्लोड येथे लाभ मिळणार आहे. कोरोना साथीच्या काळात सोनार रुग्णालयात बाल कोविड सेंटर सुरू करण्यात आले होते असे सांगत आता सरकारी योजनांअंतर्गत गरीब कुटुंबातील मुलांवरही या रुग्णालयात उपचार केले जातील असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात आरोग्य सुविधेचे बळकटीकरण करण्यात येत आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना गरिबांसाठी वरदान असल्याचे प्रतिपादन यावेळी आ. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले. राज्यातील नागरिकांना गंभीर आजारांवरील दर्जेदार उपचार पूर्णतः मोफत उपलब्ध करवून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यात सध्या महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसह एकत्रितपणे राबवली जात असून गरजूंनी याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर, राजश्री निकम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, श्रीरंग पाटील साळवे, अब्दुल आमेर, कुणाल सहारे, माजी नगरसेवक अकील वसईकर, शिवसेना पदाधिकारी देविदास पा.लोखंडे, डॉ.पी.टी.सोनार, डॉ. एम.पी. सोनार, स्वप्नील सोनार, जयश्री सोनार आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. एस.पी. सोनार यांनी केले आणि सूत्रसंचालन रेणुका विसपुते यांनी केले. डॉ. रूपाली सोनार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनार कुटुंबासह रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

## सोयगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे तालुका अध्यक्ष संजय शहापूरकर यांचा सत्कार



सोयगाव,दि.२० मे : छत्रपती संभाजीनगर येथे केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वार्षिक सभेत कुपोषण मुक्तीचे उत्कृष्ट काम केल्याबद्दल सोयगाव येथील तालुका केमिस्ट अध्यक्ष तथा समाजसेवक संजय शहापूरकर यांचा गौरव करण्यात आला.त्यानिमित्त त्यांचे सोयगाव तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन तर्फे त्यांना फुल,गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी तालुका केमिस्ट ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव अमोल पाखरे,सदस्य दिनेश पंडित,विनोद सोहनी,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे उपाध्यक्ष योगेश बोखारे,कृषीभूषण शेतकरी अरुण सोहनी, यांची उपस्थित होते.

## सत्य घटनेवर आधारित शातिर The Beginning २३ रोजी प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - तर ही वानरसेना तुझ्या सोन्याच्या लंकेची राख रांगोळी करेल, असा इशारा अट्टल गुन्हेगारांना देणारा शातीर चित्रपटाचा ट्रेलर सोशल मिडियावर नुकताच लॉन्च झाला आहे. या ट्रेलरमुळे आधीच चर्चेत असलेल्या या चित्रपटाबद्दल उत्सुकता निश्चितपणे वाढवली जाणार आहे. शातिर The Beginning हा मराठी येत्या २३ मे रोजी रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. सध्याच्या तरुणाईची कथा सांगणारा, सत्य कथेवर आधारित शातीर, द बिगिनिंग या चित्रपटाची निर्मिती श्रियांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्सच्या माध्यमातून रेश्मा वायकर यांनी केली आहे. या चित्रपटा द्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. सध्याच्या तरुण पिढीला पडलेला अमली पदार्थांचा विळखा, ड्रग्स माफिया आणि पोलीस यंत्रणेच्या संघर्ष, व्यसनाधीनता, गुन्हेगारी यांच्याविरुद्ध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उभारलेला लढा या चित्रपटात प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.

# वारंवार आययूआय फेल्युअर्स होत आहे? पुढे काय करायचे हे जाणून घ्या

नागपूर : एकतीस वर्षांची प्रिया आठ वर्षांपासून गर्भधारणेचा प्रयत्न करत होती आणि मेडिकल हिस्ट्रीनुसार तिला लॅपरोस्कोपिक ओव्हेरियन ड्रिलिंग, मायोमेक्टोमी, सहा ओव्हुलेशन इंडक्शन सायकल आणि तीन अयशस्वी आययूआय यांचा सामना करावा लागला होता. अनेक अपचार आणि प्रक्रियांनंतर तिला शारीरिक त्रास होण्यासोबत ती मनातून निरसन न झालेल्या समस्यांमुळे खचून गेली होती.

तिला गाथेमधून मोठी वास्तविकता समोर येते: प्रजनन उपचार घेत असलेले अनेक जोडपे अयशस्वी ठरल्यानंतर देखील वारंवार आययूआय सायकल चालू राहतात. कारण ते सोयीस्कर वाटते, ज्यामधून त्यांना किमान आशा मिळते.

पण या चक्राचे प्रमाण किती असले पाहिजे?

वैद्यकीयदृष्ट्या तीन अयशस्वी आययूआय प्रयत्नांनंतर संपूर्ण पूनर्मूल्यांकनाची आवश्यकता असते. यानंतर देखील प्रयत्न सुरू ठेवल्यास अधिक गुणकारी उपचार पर्यायांना विलंब होऊ शकतो.

काय चुकीचे होत असेल?

महिलेला पीसीओएस असेल तर वाढलेली एलएच पातळी ओव्हुलेशन बिघडू शकते किंवा अंडी खराब दर्जाची होऊ शकते. पुरुष जोडीदारामध्ये कमी अनुकूल वीर्य गर्भधारणावर परिणाम करू शकतात. वेळेवर न केलेल्या प्रक्रिया, कमी लॅबोरेटरी क्वॉलिटी किंवा फायब्रॉइड्ससारखे अपरिचित अंतर्निहित गर्भाशयाचे पॅथॉलॉजी ही काही इतर कारणे असू शकतात.

पुढील उपचार काय?

वारंवार आययूआय अपेक्षित परिणाम देत नसतील तर सखोल मूल्यांकन अत्यंत महत्त्वाचे आहे:

गर्भाशयाच्या लिनिंगचे मूल्यांकन करण्यासाठी आणि एंडोमेट्रिटिस किंवा क्षयरोगाची शक्यता दूर करण्यासाठी ट्रान्सव्हॅजिनल सोनोग्राफी आणि डायग्नोस्टिक हिस्टेरोस्कोपी, गर्भाशयाच्या राखीव जागेची तपासणी करण्यासाठी एएमएच चाचणी, डब्ल्यूएचओच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वीर्य विश्लेषण, शुक्राणूंच्या गुणवत्तेसाठी डीएनए फ्रॅगमेंटेशन इंडेक्स (डीएफआय) तपासले पाहिजे, अनुवांशिक विसंगतींसाठी जोडप्याचे कॅरिओटाइपिंग.

समस्या आढळल्या - जसे अंडीची खराब गुणवत्ता किंवा जास्त डीएनए फ्रॅगमेंटेशन - तर जोडप्यासाठी वैयक्तिकृत प्रोटोकॉल आणि प्रगत शुक्राणू निवड तंत्रे (जसे की मायक्रोफ्लुइडिक्स किंवा स्पर्म सॉर्टर) वापरून आयव्हीएफ मार्ग स्वीकारणे अधिक फायदेशीर ठरू शकते.

भावनिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या, काय साह्यभूत ठरते?

नियमित प्रक्रियांऐवजी पुराव्यावर आधारित, धोरणात्मक काळजी घेण्याला प्राधान्य द्या. पारदर्शकता असलेले, व्यापक चाचणी देणारे आणि वैयक्तिक योजना विकसित करणारे क्लिनिक्स शोधा.

## एमजीएम आयएचएसमध्ये डर्माटोरूमॅटोलॉजी परिषद संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ : एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस छत्रपती संभाजीनगर येथे रविवार, दिनांक १८ मे २०२५ रोजी इंटरनॅशनल असोसिएशन फॉर डेंटल रिसर्चच्या सहकार्याने डर्माटोरूमॅटोलॉजी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम. जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी डॉ.अशिष देशमुख आणि डॉ.मनीष कदम व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी इंडियन असोसिएशन ऑफ डर्माटोलॉजिस्ट्स, व्हेनेरिओलॉजिस्ट्स अँड लेप्रोलॉजिस्ट्सचे अध्यक्ष यांची विशेष उपस्थिती होती. देशातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील निवासी डॉक्टरांनी विविध विषयांवर आपले प्रबंध सादर केले. डॉ.ससिकला ई. यांनी एलपी-एलई ओव्हरलॅप या दुर्मिळ विषयावर माहितीपूर्ण प्रबंध सादर केला.

## तुळसाबाई आंबेकर यांचे निधन



सोयगाव,दि.२१ मे : तालुक्यातील जरंडी येथील तुळसाबाई गणपत आंबेकर(वय.८५) यांचे मंगळवारी (दि.२०)दुपारी १२ वाजून दहा मिनिटांनी निधन झाले.बुधवारी( दि.२१) सकाळी दहा वाजता त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक नातू,एक नात व नात सून असा परिवार आहे.येथील महा ई केंद्र संचालक सचिन आंबेकर यांच्या त्या आजी होत्या.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २१-०५-२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **निखिलकुमार हरिदास काटोले** यांनी मोहल्ला **दयाळनगर** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. **११४५/ब** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : नगरपंचायत अंतर्गत रस्ता** **पश्चिम : मनिष तोताराम शिंपी यांची जागा**
**दक्षिण : प्रदिप चित्र मंदिरची जागा** **उत्तर : सुनिता शंकर काटोले यांचे घर**

आकार : पूर्व पश्चिम **४०× १५.५= ६२०** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## अग्रलेख...

# धर्मशाळा नाहीच, असूही नये

"जगभरातील निर्वासितांना सामावून घेण्यासाठी भारत म्हणजे धर्मशाळा (सार्वजनिक आश्रयस्थान) नव्हे," हा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचा अभिप्राय धर्म-देशाच्या पल्याड राष्ट्रीयत्वाच्या अंगाने समस्त भारतीयांनी आणि त्यातही राजकीय पक्षांनी, सामाजिक धुरिणांनी समजून घ्यावा, असा आहे. लिट्टे या खतरनाक दहशतवादी संघटनेचा सदस्य राहिलेल्या श्रीलंकेतील एका नागरिकाच्या भारतात आश्रय मिळण्याची विनंती करणाऱ्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. या नागरिकाला २०१८ मध्ये विशेष न्यायालयाने बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरविले होते. त्याला १० वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली होती. मद्रास उच्च न्यायालयाने त्यात बदल करून शिक्षेचा कालावधी सात वर्षांवर आणला होता आणि शिक्षा पूर्ण झाल्याबरोबर भारत सोडून जाण्यासही त्याला सांगितले होते. याविरुद्ध हा श्रीलंकन नागरिक सर्वोच्च न्यायालयात गेला होता, ही या अभिप्रायाची पृष्ठभूमी. भारताने हजारो वर्षांपासून देशोदेशीच्या लोकांना त्यांच्या वैविध्यासह सामावून घेतले. परंतु, आता आपण १४० कोटींच्या वर झालेलो आहोत. आपले आणि आपल्या लोकसंख्येचे असंख्य प्रश्न आहेत. त्याकडे लक्ष द्यायचे की निर्वासितांना सामावून घेत स्वतःच्या प्रश्नांमध्ये भर घालायची, हे ठरविण्याची ही वेळ आहे, हा सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीचा मथितार्थ. त्यामुळेच तिला मानवाधिकार, मानवता इत्यादी दृष्टिकोनातून पाहण्याचे कारण नाही. या अभिप्रायाकडे भारताच्या निर्वासितांबाबतच्या धोरणाची स्पष्ट दिशा म्हणून पाहिले पाहिजे. १.४ अब्ज लोकसंख्येच्या भारतात आधीच अनेक अंतर्गत आव्हाने आहेत. अनेक आव्हानांचे स्वरूप अतिशय उग्र आहे. गृहनिर्माण, नैसर्गिक संसाधने आणि सामाजिक गरज म्हणून पायाभूत सुविधांवरील ताण अतिशय वाढला आहे. अनेक शहरांमध्ये पाण्याची गंभीर समस्या आहे. वेगाने होत असलेले शहरीकरण, बेरोजगारी, आरोग्यसेवेतील न्यून आणि शैक्षणिक सुविधांमधील तफावत हे गंभीर प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी सरकार सक्रियपणे काम करीत आहे. अशा स्थितीत निर्वासित म्हणून एक व्यक्ती असो वा अनेक लोक, कुणालाही मान्यता देताना एक नव्हे, हजार वेळा विचार केला पाहिजे. एका व्यक्तीचा अर्ज सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला असता तर त्यापाठोपाठ हजारो-लाखो अर्ज आले असते आणि या केसचे उदाहरण घेऊन त्यांना मंजुरी द्यावी लागली असती. देशात लाखांच्या संख्येत आजही शेजारच्या अनेक देशांतील निर्वासित आहेत, ही वस्तुस्थिती अमान्य करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने श्रीलंकन नागरिकाचा अर्ज फेटाळून लावताना या एकाच अभिप्रायात हा विषय निकाली काढला आहे. कोणतीही अधिकृत कागदपत्रे नसलेले आणि देशाच्या सुरक्षेसाठी धोका निर्माण करू शकणारे निर्वासित हा कोणत्याही देशाच्या दृष्टीने अडचणीचा विषय असतो. त्याला मानवतावाद वगैरेंच्या पलीकडे जाऊन व्यावहारिक नजरेने पाहावे आणि हाताळावे लागते. आंतरराष्ट्रीय मानवतावादी जबाबदाऱ्यांचा विचार करण्याआधी भारत आणि भारतीय नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करावा लागतो. भारतातील सर्वांसाठी शिक्षण, आरोग्य, पाणी, घरकूल हे तर हवेच; शिवाय रोजगार निर्मिती, डिजिटल कनेक्टिव्हिटी, पायाभूत सुविधांचा विकास यातही सतत प्रगती होत राहणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकारने प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन आणि आयुष्मान भारत यासह अनेक पावले उचलली आहेत. या योजना भारतीय नागरिकांसाठी तयार केल्या आहेत. त्यात निर्वासितांची भर पडत राहिली तर यातली एकही योजना यशस्वी होणार नाही.

आपापल्या देशात छळ सोसलेल्या असंख्य लोकांसाठी आश्रयस्थान म्हणून भारताचे ऐतिहासिकदृष्ट्या सर्वांना माहिती आहेच. तिबेट, अफगाणिस्तान, बांगलादेश, म्यानमार अशा अनेक देशांमधील लोकांनी भारतात आश्रय घेतला. पूर्वी तर इराणसारख्या दूरच्या देशांतूनही निर्वासित येत असत. भारताची भौगोलिक स्थिती आणि सर्वसमावेशक अशी सांस्कृतिक-सामाजिक नीती यामुळे निर्वासितांसाठी भारत ही आशा आणि आधार होता. तो आजही आहेच. मोदी सरकारच्या नव्या धोरणानुसार छळ सोसत असलेल्या विविध धर्मांच्या लोकांना भारतात नागरिकत्व दिले जात आहे. मानवता आणि भारतीय संस्कृती अशा दोन्ही गोष्टींचा या धोरणाला आधार आहे. तथापि, भारताने विविध टप्प्यांवर परोपकाराची आणि औदार्याची किंमतही मोजली आहे, हे विसरून चालणार नाही. निर्वासित म्हणून आलेल्यांनी अनेकदा हैदोस केल्याची उदाहरणे आहेत. एका अनुमानानुसार सध्या भारतात दोन कोटींहून अधिक बेकायदेशीर स्थलांतरित लोक राहतात. आसाम, पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील काही भागांमध्ये त्यांची संख्या अधिक आहे. अगदी मुंबई-पुणे-नागपुरातही अवैध स्थलांतरित होते व आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानशी झालेल्या संघर्षादरम्यान हे वास्तवही चव्हाट्यावर आले होते. ही अवैध लोकसंख्या सर्व प्रकारच्या यंत्रणा आणि व्यवस्थांवर ताण निर्माण करतात. अनेकदा जातीय आणि वांशिक संघर्षही त्यातून घडत असतात, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. आसामसारख्या राज्यात, बेकायदेशीर स्थलांतरामुळे लोकसंख्येचे संतुलन (डेमोग्राफिक बॅलन्स) बदलले आहे. त्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होण्याखेरीज आणि वांशिक स्वायत्ततेच्या मागण्या वाढल्या आहेत. मणिपुरातील स्फोटक स्थिती हे त्याचे जिवंत उदाहरण. नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) यांचे संदर्भ या पृष्ठभूमीवर समजून घ्यावे लागतात. बांगलादेशातून अंदाजे एक कोटींहून अधिक बेकायदेशीर स्थलांतरित भारतात आले आहेत. म्यानमारचे रोहिंग्या हजारोंच्या संख्येत भारतात आले आहेत. अफगाणिस्तान, तिबेटचेही निर्वासित आहेत. त्यापैकी काहींना भारत मान्यता देत आहे, हा भाग वेगळा. आणखी एक बाब लक्षात घ्यावी लागते आणि ती अशी की, मोठ्या प्रमाणात निर्वासितांच्या प्रवाहाच्या समस्येला तोंड देणारा भारत हा जगातील एकमेव देश नाही. अमेरिकेत इमिग्रेशन कायद्याची अंमलबजावणी हा निर्वासितांविषयीच्या धोरणाचा आधारस्तंभ. अमेरिकेत राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका मानल्या जाणाऱ्या किंवा बेकायदेशीरपणे प्रवेश केलेल्या व्यक्तींना ताब्यात घेतले जाते आणि देशाबाहेर रवानगी केली जाते. ऑस्ट्रेलियाने बोटीतून येणाऱ्या निर्वासितांसाठी ऑफशोअर डिटेंशनचे धोरण स्वीकारले आहे. युरोपातील अनेक देशांना, विशेषतः सीरियन यादवी युद्धाच्या पृष्ठभूमीवर, प्रचंड दबावांचा सामना करावा लागला. सुरुवातीला जर्मनीने १० लाखांहून अधिक निर्वासितांचे स्वागत केले. परंतु त्यानंतर सामाजिक ताण निर्माण झाला. तेव्हापासून युरोपियन युनियनमधील सदस्य राष्ट्रांनी काही कठोर उपाय सुरू केले आहेत. मानवतेशी बांधिलकी असणे वेगळे आणि स्वतःच्या नागरिकांचे संरक्षण करणे वेगळे. मानवतावादाची गरज म्हणून दाखविले जाणारे औदार्य हे राष्ट्रीय प्राधान्यांशी संतुलित असलेच पाहिजे. बेकायदेशीर स्थलांतर आणि अनियंत्रित निर्वासितांच्या प्रवाहाविरुद्ध मोदी प्रशासनाने कडक दृष्टिकोन स्वीकारला आहे. सीमांवर कुंपण उभारणे, बायोमेट्रिक ट्रॅकिंग आणि आंतर-सरकारी चर्चांवरदेखील काम सुरू आहे. भारत मानवतावादी परंपरा सोडून देऊ शकत नाही. परंतु, राष्ट्रीय हिताशी तडजोडदेखील स्वीकारार्ह नसते. मानवी हक्क सिद्धांततः सार्वत्रिक असले, तरी सार्वभौम राष्ट्रांच्या सीमा सुरक्षित करण्याच्या, अंतर्गत शांतता, सौहार्द राखण्याच्या आणि आपल्या नागरिकांना संसाधनांचा वापर करण्यासाठी दिलेल्या अधिकारांच्या मोबदल्यात आत्यंतिक मानवतावादी व्हायचा प्रयत्न केला तर ते अंगावर उलटते, भारत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याची आकांक्षा बाळगत असताना शांतता, स्थैर्य, कायदा-सुव्यवस्था आणि लोकसंख्या व्यवस्थापन हे आपले प्राधान्याचे विषय आहेत. आश्रयस्थान हे गरजूला दिले जाते आणि धर्मशाळा सर्वांसाठी असते. भारत हे गरजूंचे आश्रयस्थान होते आणि राहील. पण, ती धर्मशाळा नव्हे आणि तसे ते असूही नये, हे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे शत-प्रतिशत खरे आहे.


## श्रद्धांजली

# महर्षी काळाच्या पडद्याआड

निरंजन अभ्यंकर

एक मे १९८९ मध्ये मी 'आयुका'मध्ये कामाला सुरुवात केली. तेव्हापासूनच म्हणजेच गेली ३६ वर्षे डॉ. जयंत नारळीकर यांचा सहवास लाभला. या प्रदीर्घ काळात एकत्र काम करताना अनेक आठवणींचा संचय तयार झाला. सरांच्या निधनाने त्या ताज्या झाल्या असून त्यांचे नसणे ही अत्यंत दुखद बाब आहे. सरांचे नाव निघताच कार्यरत असताना आणि निवृत्तीनंतरही सततचा त्यांचा उत्साही वावर डोळ्यासमोर येतो. थकल्यानंतरचा अलिकडचा काळ वगळता ते अधूनमधून संस्थेत येत असत. अगदी गेल्या वर्षीपर्यंत मी 'आयुका'मध्ये कार्यरत असल्यामुळे त्यांना भेटण्याची, चार शब्द बोलण्याची संधी मिळायची. प्रदीर्घ सहवासात या व्यक्तिमत्त्वाने मी पुरता भारावलो होतो. शास्त्र, गणित हे विषय आणि मराठी-इंग्रजी-हिंदी आणि संस्कृतवरील त्यांचे प्रभुत्व विलक्षण होते. नंतर त्यांनी फ्रेंच भाषेचाही अभ्यास केला होता. असा हा ज्ञानी, विद्वान शास्त्रज्ञ नानाविध गुणांनी संपन्न होता. वेळ पाळण्यात त्यांचा हात धरणारे क्वचितच कोणी असेल. ते आले की घड्याळ लावून घ्यावे, अशी ख्यातीच होती. केवळ ऑफिसमध्येच नव्हे तर, कोणत्याही समारंभ वा अन्य कार्यक्रमालाही ते दिलेल्या वेळेपूर्वी दहा मिनिटे हजर असत.

डॉ. नारळीकर यांना कोणतेही काम शंभर टक्के अचूक लागायचे. स्वत:चे योगदान शंभर टक्के असल्यामुळे स्वाभाविकच समोरच्या व्यक्तीकडूनही त्यांची तितक्याच अचूकतेची अपेक्षा असायची. 'आयुका'चे संचालकपद स्वीकारल्यानंतर त्यांनी आपल्या संशोधन कामाबरोबरच संयोजन आणि आर्थिक व्यवहार, हिशेब तपासणी यामध्येही जातीने लक्ष घातले. त्याविषयी जाणून घेतले. ते स्वत: उत्तम संयोजक होते. स्वाभाविकच त्यांच्याकडून आम्हाला यातील नेमकेपणा शिकायला मिळाला. अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व असणारे जयंत नारळीकर सकारात्मक आणि सहज संभाषणाने, संवादाने समोरच्या व्यक्तीवरील तणाव अगदी सहज दूर करायचे. 'आयुका'मध्ये आलो तेव्हा मी अवघ्या २५ वर्षांचा होतो. तेव्हा त्यांच्याविषयी असणारी आदरयुक्त भीती अगदी शेवटपर्यंत होतीच. पण सरांनी नेहमीच आम्हाला समजून घेण्याची भूमिका घेतली. हातून काही चूक झाली तरी त्यांना मोकळेपणाने सांगता येईल, चुकीची कबुली देता येईल इतकी सहजता त्यांनी आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांबरोबरील नात्यामध्ये ठेवली. चूक कशी दुरुस्त करायची ते आपण बघू, हे त्यांचे समजुतीचे वाक्य आजही स्मरते. सुदैवाने तशी वेळ आली नाही, पण हा विश्वास खूप महत्त्वाचा होता.



'आयुका'मध्ये मी अकाऊंटंट म्हणून रुजू झालो. सुरुवातीला नारळीकर सर ज्येष्ठ लेखापालांकडून माझे काम तपासून घेत असत. विशेषत: आयकराशी संबंधित कामाची तपासणी व्हायची. पण तपासणीत एकही चूक आढळायची नाही, तेव्हा ते मोकळेपणाने पाठीवर हात टाकायचे आणि काम अचूक केल्याबद्दल कौतुकाचे शब्द बोलायचे. तेव्हापासून आमची त्यांच्यापुढे उभी राहण्याची भीती कमी झाली, असे मी म्हणेन. सरांनी विज्ञानक्षेत्रात हिमालयाच्या उंचीचे काम करुन ठेवले आहेच; खेरीज ते विविध भाषांमध्ये मांडले आहे. 'पुलं'च्या देणगीतून त्यांनी 'सायन्स मुक्तांगण विज्ञान शोधिका' स्थापन केली तेव्हा त्याचा उद्देशच लहान वयापासून मुलामुलींच्या मनात विज्ञानाची आसक्ती निर्माण करणे आणि पुढे त्यांना शास्त्रशाखेत कार्यरत होण्यास मदत करणे, हा होता. मुलांची विज्ञानविषयक संशोधनात रुची वाढवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. अर्थातच यासाठी त्यांचे सहजसोपे लेखन कामी आले. यातून भारतालाच नव्हे तर समस्त विश्वाला प्रेरणा मिळाली. त्यांनी लावलेले शोध, मांडलेली सूत्रे, वैज्ञानिक गोष्टींची मांडणी जगाला अचंबित करणारी आहे. म्हणूनच जागतिक पातळीवर घेतल्या जाणाऱ्या अनेक कार्यशाळांमध्ये 'कॉस्मोलॉजी' या विषयावर त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचा संदर्भ घेऊन अनेक व्याख्याने, चर्चासत्रे सुरू असतात. युट्युबवरही त्यांची अनेक व्याख्याने उपलब्ध आहेत.

विज्ञानासारख्या किचकट क्षेत्रामध्ये हरवून जाणारे सर विनोदी प्रवृत्तीचे होते. ते कधी कधी असे एखादे वाक्य बोलायचे की, पुढचा बराच काळ चेहऱ्यावरील हास्याची लकेर पुसली जायची नाही. त्याचबरोबर ते हजरजबाबी होते. संस्कृत भाषेचा उत्तम अभ्यास, ज्ञान असल्यामुळे वेळ पडेल तेव्हा ते काही वचने आणि अर्थ स्पष्टीकरणासाठी सांगायचे. इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होते. म्हणूनच शास्त्राबरोबरीने त्यांच्या भाषेवरील प्रभुत्वाचे अपार कौतुक वाटायचे. अचूक शब्दाचा वापर ही त्यांची खासियत होती.

अशा या थोर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव असणे अगदी स्वाभाविक आहे. एक आठवण सांगतो. तो दिवाळीतील एक दिवस होता. पण सुटीच्या दिवशी एका रिपोर्टचे काम करण्यासाठी त्यांनी मला ऑफिसमध्ये बोलावले होते. नऊ वाजता बोलावले असताना मी पावणे नऊच्या सुमारात ऑफिसमध्ये पोहोचलो आणि लेजर काढून हाताने कामाला सुरुवात केली. पाठोपाठ नऊच्या आधीच सर आले आणि लांबूनच मला काम करताना बघून गालात हसले. कदाचित तेथेच मी जिंकलो होतो. नंतर दुसऱ्या कामासाठी ते निघून गेले. काम संपवल्यानंतर मी काहीशा भीतीनेच घरी फोन करून त्यांना काम पूर्ण झाल्याचे सांगितले. त्यावर केलेले काम तेथेच ठेवून घरी जाण्यास त्यांनी मला सांगितले. त्यानंतर सुटी संपल्यानंतरच्या दिवशी वेळेआधीच ते आले. टेबलवरील मी ठेवलेला पेपर तपासला, काही सूचना केल्या आणि ठीक नऊ वाजता मी खाली मान घालून काम करत असताना समोर उभे राहत मला सुधारित काम पाठवून देण्याची सूचना दिली. यावेळी सुटीच्या दिवशी काम केल्याबद्दल कौतुक करायला ते विसरले नाहीत. आणखी एक आठवण म्हणजे, मी केलेले एक काम त्यांना पसंत नव्हते. इतरांनी चुकीच्या गोष्टी सांगितल्यामुळे मी केलेली आकडेमोड त्यांना चुकीची वाटत होती. पण काम अचूक असल्याच्या भूमिकेवर मीही ठाम होतो. असे असताना सरांनी मला थेट आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडे जाऊन केलेले काम योग्य असल्याची खातरजमा करण्यास सांगितले. खरे तर तसे होणे शक्य नव्हते. पण तरीही सरांच्या आग्रहाखातर मी तेथे गेलो. अपेक्षेप्रमाणे तेथे उत्तर मिळाले नाही. येऊन ही बाब मी सरांना सांगितली. त्यानंतर त्यांनी तीन-चार लेखापालांकडून काम तपासून घेतले. खेरीज दिल्लीला गेले असता तेथील विद्यापीठाच्या व्हाईस चान्सलरकडूनही हे काम तपासून घेतले. तेव्हा त्यांनीही काम अचूक असल्याचा निर्वाळा दिला आणि तुम्हाला त्या मानाने नाममात्र आयकर भरावा लागतोय, हे स्पष्ट केले. इतके सगळे झाल्यानंतर परत आल्यानंतर सर मला भेटले, पाठीवर हात ठेवला आणि केलेले काम बरोबर होते, असे स्पष्टपणे सांगितले. २५ व्या वर्षी प्रथम भेटीमध्ये पाहिले तेव्हा डॉक्टर झब्बा-पायजमा घालून, हातातील पिशवीमध्ये फणस सांभाळत येताना पाहायला मिळाले होते. ते तेव्हाही साधे होते आणि आतापर्यंत साधेच होते. वागण्या-बोलण्यातला साधेपणा त्यांनी तितक्याच सहजतेने जपला होता. त्यांची ती छबी, अदबीने बोलण्याची सवय कधीच विस्मरणात जाणार नाही. त्यांच्या रूपाने दररोज मला जणू सरस्वतीचेच दर्शन व्हायचे. आता ते होणार नाही. अनंतात विलीन झालेले सर, आमचे महर्षी स्मृतींमध्ये मात्र कायम होते तसेच राहतील.

(लेखक 'आयुका'चे माजी ज्येष्ठ कार्यकारी अधिकारी आहेत.)

## 'विज्ञानाचा वारकरी'

विज्ञानाची गंगा नेली
ज्यांनी घरोघरी
थोर गणिती, ज्ञानमहर्षी
गेले देवाघरी

शिकविले ग्रहगोल निरीक्षण
काळोखातील रात्री
आकाशाशी नाते जोडून
गेले खगोलशास्त्री

विज्ञानाचा वारकरी हा
लेखक शास्त्र कथांचा
विज्ञानाची गोडी लावली
राखुनी मान प्रथांचा

संतुलित, समतोल, विचारी
मितभाषी अन तृप्त
विद्यापीठ जणू 'जयंत' रुपी
पद्मविभूषण प्राप्त

गणिताच्या नावाने केवळ
जे घाबरती, दमती
त्यांच्यासाठी तुम्ही शिकविल्या
गणिती गमतीजमती

विश्वस्तरावर गुणवत्तेने
दिव्य लाभली कीर्ती
विज्ञानाच्या गाभाऱ्यामध्ये
कायमस्वरूपी मूर्ती

खास हातोटी संवादाची
विशेष शाब्दिक कला
ध्रुवताऱ्याच्या उंचीचा पण
माणूस साधा भला !


आज खरोखर जडले तुमचे
'आकाशाशी नाते'
तुमच्या साठी स्वागतगीतही
आकाशगंगा गाते !

- मुरारी देशपांडे, 'संगमनेरी'
९८५०४१५७४४

# माणुसकीचा खळाळता झरा 'डॉ. जयंत नारळीकर'

जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाची बातमी अतिशय दु:खदायक आहे. या थोर शास्त्रज्ञाला शतशः प्रणाम. या महान शास्त्रज्ञाच्या मनातली माणुसकी दाखवून देणारी एक आठवण आज मनात पुन्हा प्रज्वलीत झाली. ६ मे २०१३ च्या साप्ताहिक सकाळमध्ये मी एक लेख लिहिला होता. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत वाढलेल्या एका कामगाराच्या पत्नीने आपल्या हिंमतीवर धावपटू म्हणून कसं नाव कमावलं याची ती यशोगाथा होती. जिचं सगळं लहानपण आईच्यामागे खुरपणी करत धावण्यात गेलं अशा संगीता खंडागळे हिची ही कर्तृत्व गाथा होती. शाळेचं तोंडहि न पाहिलेली व दिवसाला २ रुपये मजुरी मिळवणारी ही मुलगी लग्नानंतर पुण्यात आली. बोपोडीतल्या एका झोपडपट्टीसदृश वसतीत तिचा संसार सुरु झाला. तिनेच सांगितलेल्या तिच्या कहाणीत नारळीकर दांपत्याच्या मनातला माणुसकीचा झरा मला ऐकायला मिळाला.

आपल्या जिद्दीवर तिनं अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धातली सुवर्णपदकं पटकावली होती.



पुण्यात एकदा तिनं मॅरेथॉन स्पर्धा पाहिली. मला असं पळता येईल का असा भाबडा प्रश्न तिनं तिच्या नव-याला विचारला. तेथून ती पळण्याच्या इर्ष्येने झपाटली गेली. त्यानंतर सुरु झाली तिची अखंड मेहनत. साडी नेसणा-या व पायात स्लिपर घालणा-या संगीताताईंनी विद्यापीठाच्या ग्राऊंडवर पळण्याचा सराव सुरु केला. भल्या पहाटे ती पळायला जात असे. घरी लवकर परतण्याची घाई होती, कारण दोन छोट्या मुलांना घरी झोपवून ती पळायला यायची. दोन चार दिवस गेले. मुलं घरी उठून रडायला लागली. शेवटी मुलांना बरोबर घेऊन ती जायला लागली. एका झाडाखाली मुलांना बसवून ती त्यांच्या अवती भवती, तिथल्या तिथं धावायची. मुलं घाबरतील या भीतीनं तिला दूरवर जाता येत नव्हतं.

योगायोगाने एक दांपत्य तिथं रोज फिरायला येत असे. साडी वर खोचलेली ही बाई अनवाणी पायांनी तिथल्यातिथं धावत असल्याचं पाहून त्यांचं कुतुहल चाळवलं गेलं. त्यांनी तिची चौकशी केली. आम्ही तुझ्या मुलांकडे पाहतो, तू पाहिजे तेवढं लांब जात जा असं त्यांनी तिला सांगितलं आणि मग तो रोजचाच परिपाठ सुरु झाला. ते दांपत्य म्हणजे डॉ. जयंत नारळीकर आणि त्यांच्या पत्नी मंगलाताई. थंडी वाढायला लागली. मुलांना इथं त्रास होईल. तेंव्हा तू त्यांना आमच्या घरीच सोडत जा असं त्या मॅडम संगीताला म्हणाल्या. संगीतालाही ते पटलं. मुलांना त्यांच्या घरी सोडून ती पळण्याचा सराव करायला लागली. त्या काळात दोघेहीजण त्या मुलांची काळजी घेत, त्यांचं खाणं पिणं बघत. मॅडमनी त्यातल्या थोरल्याला थोडं शिकवायलाही सुरुवात केली. काही दिवस गेले. घरी टी.व्ही. वरच्या एका कार्यक्रमात संगीताने नारळीकरांना पाहिलं आणि ती चमकलीच. दुस-या दिवशी, तुम्ही डॉ. नारळीकर का?, असं तिने थेट डॉक्टरांनाच विचारलं. तेंव्हापासून या परिवाराशी तिचा स्नेह जडला. तिच्या मुलींच्या लग्नाला हे दांपत्य आवर्जून उपस्थित होतं. मोठं मन म्हणजे आणखी वेगळं काय असतं ? शाळा न शिकलेल्या, पहिली स्पर्धा बूट न घालता पळणा-या संगीताने पुढे देशोदेशीच्या स्पर्धेत भाग घेतला. अनेक पदकं पटकावली. ही सगळी कथा त्या लेखात मी लिहिली होती. डॉ. नारळीकरांचे निधन झाल्याची बातमी ऐकून मला ती कहाणी आठवली. माणुसकीचा एवढा खळाळता झरा ज्याच्या मनात वाहतो त्याला देवमाणुसच म्हटलं पाहिजे.

- भगवान दातार
bhagwandatargmail.com

## वेध

गिरीश शेरेकर

# पार्किंग समस्येचे विक्राळ स्वरुप

देशाच्या मोठ्या शहरांमध्ये असलेली पार्किंगची समस्या आता मध्यम, छोट्या व तालुका स्थानांवरच्या शहरांमध्येही पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांच्या मुख्यालयी आणि त्या अंतर्गत येणाऱ्या ३५८ तालुका स्थानांवरच्या शहरांमध्ये पार्किंगच्या समस्येने विक्राळ स्वरूप घेतले आहे. त्याची अनेक कारणे आहेत. वाहनांची वाढलेली संख्या व वाहन ठेवण्यायोग्य जागेची कमतरता हे त्यातले मूळ कारण आहे. राज्याची एकूण लोकसंख्या १२ कोटी ६३ लाखाच्या आसपास आहे आणि जवळपास ७.५ कोटी कुटुंबे आहेत. मोटर वाहन विभागाच्या नोंदीनुसार राज्यात सर्व प्रकारच्या वाहनांची संख्या ५ कोटींच्या आसपास झाली आहे. आकडेवारीनुसार, सर्वच कुटुंबांकडे वाहन नसल्याचे दिसते पण, काही कुटुंबांमध्ये जितकी माणसे तितकी वाहने आहेत. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात आणि त्यातही मध्यमवर्गीय व त्यापेक्षा समृद्ध लोकांकडे वाहनांची संख्या जास्त पाहायला मिळते.

वाहनांच्या वाढलेल्या संख्येमुळेच पार्किंग व वाहतूक कोंडीच्या समस्येने उचल घेतली आहे. विदर्भातल्या ११ जिल्ह्यांच्या मुख्यालयी शहरांमध्ये नसलेली पार्किंग व्यवस्था व त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी दररोज चर्चेचा विषय असते. या शहरातल्या कोणत्याही मुख्य आणि उपबाजारपेठत जा तुम्हाला चारचाकी तर सोडाच दुचाकी ठेवायला सुद्धा लवकर जागा मिळत नाही. त्याचा खूप मनस्ताप होतो. अगदी एका हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्याच दुकानदारांकडे फक्त दुचाकी ठेवायला जागा असते. उर्वरित दुकानदारांकडे त्यांची आणि त्यांच्या दुकानात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वाहने ठेवायलाही जागा नसते. अशा स्थितीत ग्राहकांनी वाहने कुठे ठेवायची हा मोठा प्रश्न आहे. सर्वांसाठी दुखणे झालेली ही समस्या सोडवायची कशी यासाठी काहीच उपाययोजना होताना दिसत नाही. उलट नो पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत. तेथे वाहन ठेवले तर कारवाई करून दंड ठोठावला जातो. मग लोकांनी वाहने ठेवायची कुठे? या प्रश्नाचे उत्तर कारवाई करणाऱ्या वाहतूक पोलिसांकडे तर अजिबातच नाही आणि स्थानिक स्वराज्य संस्थेला त्याचे देणेघेणे उरलेले नाही. याच संस्था पार्किंग समस्येसाठी जबाबदार आहेत. कारण, नियम धाब्यावर बसवून बांधकामाची मंजुरी कोणी दिली? लोकांकडे पर्याय नसल्याने रस्त्याच्याकडेला असणाऱ्या फुटपाथवर दाटीवाटीने वाहने ठेवली जातात. त्यामुळे पादचारी मुख्य रस्त्यावरून चालतात. सोबतीला धावणारी वाहने असल्याने वाहतूक कोंडी होते. ज्यांनी चारचाकी घेतल्या आहेत, अशा ६० टक्के लोकांकडे पार्किंगसाठी जागा नाही. ही मंडळी घराच्यासमोर म्हणजे रस्त्याच्या काठावरच गाडी लावतात. कोणत्याही मोहल्ल्यात, कॉलनीत, गल्लीत फेरफटका मारा चित्र अगदी स्पष्ट दिसेल. येणाऱ्या जाणाऱ्यांना त्याचा त्रास होतोच. वाहनांची संख्या वाढत असल्याने प्रदूषणात होणारी वाढ ही आणखी एक वेगळीच समस्या आहे.

पार्किंग समस्येवर उपाय शोधणे अत्यावश्यक झाले आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि सोयीस्कर करणे, वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा करणे, मोठ्या शहरांमध्ये स्मार्ट पार्किंग व्यवस्था उभारणे, मध्यम शहरात जास्त पार्किंग सुविधा निर्माण करायला प्राधान्य हवे. बेकायदेशीर आणि चुकीच्या पद्धतीने पार्किंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, हा तात्पुरता इलाज आहे. हा रोग कायमस्वरूपी बरा करायचा असेल तर उपरोक्त उपयांशिवाय पर्याय नाही. जानेवारी महिन्यात परिवहन विभागाने पार्किंग समस्या सोडविण्यासाठी एक प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला. त्या प्रस्तावानुसार चारचाकी वाहन खरेदी करण्यापूर्वी इच्छुकाला वाहन पार्क करण्यासाठी पुरेशी जागा असल्याचे प्रमाणपत्र (सर्टिफाईड पार्किंग एरिया (सीपीए) दाखवणे अनिवार्य असेल. तसेच १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या वाहनांचे नूतनीकरण करताना हे प्रमाणपत्र दाखवावे लागेल, तरच त्यांना फिटनेस प्रमाणपत्र दिले जाईल. सध्या हा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे. चर्चा सुरू असून मंजुरी मिळते की नाही हे पाहावे लागेल. मोठ्या शहरातील पार्किंग समस्येवर मार्ग काढण्यासाठी राज्यात लवकरच 'एकात्मिक पार्किंग धोरण' आणण्याचा विचार परिवहन विभाग करत आहे. या धोरणाची प्राथमिक अंमलबजावणी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये करण्याचे नियोजन आहे. सदर दोन्ही प्रस्ताव अंमलात आणण्याला हरकत नाही. पण, त्याची अंमलबजावणी काटेकोर व्हायला हवी. इतर देशात पार्किंग समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, त्याचाही अभ्यास होणे नितांत गरजेचे आहे. संपूर्ण अभ्यास करून एक व्यापक धोरण संपूर्ण राज्यासाठी ठरविण्याची वेळ आता आली आहे.

९४२०७२१२२५

## वाचक पत्रे

### ऑपरेशन सिंदूर अणि आयपीएल

पहलगाममधे पाकिस्तान प्रायोजित निष्पाप प्रवाशांवर अतिरेक्यांनी त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या. चीड आणणारी गोष्ट म्हणजे पत्नीसमोर नवऱ्यावर व मुलांसमोर त्यांच्या वडिलांवर गोळ्या घालून मारले. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर अभियान राबविले व दहशतवाद्यांची नऊ ठिकाणे नेस्तनाबूत केली. तसेच पाकिस्तानचे एअरबेस उडवले. विविध भारतीवर सुद्धा भारत सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी व तिन्ही सेनांचे अभिनंदनपर संदेश प्रसारित केले जात आहेत. युद्धामध्ये अगदी तरुण मुले सुद्धा हुतात्मा झाले आहेत. त्यांचे फोटो पाहून डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. पण एक संस्था अशी आहे की, जिला या गोष्टींचे काहीच घेणे देणे नाही. सध्याची परिस्थिती पाहता आयपीएलचे सामने दहा दिवसांकरिता स्थगित केल्याची घोषणा बीसीसीआयने पत्रपरिषदेत केली. हे वाचून खूपच गहिवरून आले व त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. वाटले की क्रिकेट हा खेळ त्यातल्या त्यात आयपीएल म्हणजे पैसे कमावणारा खेळ नाही आहे. पण दोनच दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात वाचले की, आयपीएलचे खेळाडू १७ तारखेपासून पुन्हा पैसे कमावण्यासाठी कंबर कसून तयार झाले. पैशाच्या पुढे सगळेच क्षम्य आहे. सरकारचे चिलखत त्यांच्या अंगात, मग काय विचारता? विधवा झालेल्या स्त्रिया, पोरके मुलं, आई-बाप हे स्वतःच स्वत:ला पाहत बसतील. क्रिकेट चाहते टीव्हीवर आयपीएलचे सामने डोळे भरून पाहतील.

**राजेंद्र मनोहर वाडी**/नागपूर

### यांत्रिक युगात नाती जपावी

तरुण भारत 'आसमंत'मधील डॉ. अविनाश मोहरील यांचा 'नात्यांचा मेंटेनन्स' हा अतिशय समर्पक असा लेख वाचला आणि तो मनाला भावला. आजचे युग हे यांत्रिक आहे. विज्ञानाने प्रगती केली आणि माणसाच्या सुखासाठी अनेक यंत्रे निर्माण झाली. काही तासांचे काम काही मिनिटांत होऊ लागले. असे करता करता माणसे देखील यंत्रवत झाली की काय असे वाटायला लागले आहे. भावना हरवत चालल्या आहेत की काय ही भीती वाटते आहे. आज संवादाची अनेक माध्यमे समोर असताना संवाद दुरावत चालला आहे ही जाणीव होते आहे. नाती टिकून राहावी हा प्रयत्न दोन्ही बाजूने व्हायला हवा तरच तो यशस्वी होतो. आज घरात अनेक यंत्रे आहेत आणि त्याचे मेंटेनन्स देखील अगदी त्या त्या महिन्यात, त्या त्या तारखेला केले जाते. तसे घरातील नात्यांचे मेंटेनन्स सुद्धा व्हायला हवे. त्यातून मनातील गैरसमजाची धूळ झटकून मन स्वच्छ केले पाहिजे. वर्षानुवर्षे चढलेली ही धुळीची पुटं हळूहळू नातीच दिसेनाशी करतात आणि मग उशीर झाला की ती सावरता सावरता अवघड होऊन जातं. आपल्या संस्कृतीत सण, उत्सव, सोहळे साजरे केले जातात. खरं पाहिलं असता हा सण उत्सवाचा काळ नात्यांचे मेंटेनन्सच करत असतो अगदी सहजपणे. घरात स्त्री असो की पुरुष अनेक नातीही असतातच. काही रक्ताची तर काही मुद्दाम जोडलेली नाती असतात. या नात्यात ओरखडे येऊ नये याची काळजी दोघांनीही घेतली पाहिजे. त्यासाठी वाद नाही तर सुसंवाद आवश्यक आहे. केवळ एकाच बाजूने विचार न करता मी त्या जागेवर जाऊन विचार करायला हवा म्हणजे उत्तर सापडेल. शब्दांची जादू फार मोठी आहे. शब्द जोडतात आणि शब्दच तोडतात त्यामुळे शब्द जपून वापरायला हवेत.

कधी माफी मागणे आणि माफ करणे हे देखील करता यायला हवं. उगाच अट्टहास इथे काही कामाचा नाही हा विचार केला पाहिजे. जीवनाच्या या वळणावर आनंदाचे झाड लावायचे. मैत्रीच्या नात्यांची फुले बहरू द्यायची, तरच हे आयुष्य सुंदर होईल यात शंका नाही.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### पर्यटनांच्या संधी व आनंद

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दळणवळणाच्या अनेक सोयी केल्या आहेत. चौपदरी रस्ते, उड्डाण पूल, भुयारी मार्ग व द्रुतगती मार्ग व बरेच. त्यमुळे देश जोडला गेला आहे. अगदी अंतर्गत भागात राहणारे लोक सुद्धा आता शहरी भागांना जोडले गेले आहेत. बसच्या सोयी वाढल्या आहेत. खाजगी वाहनांनी लोक भरपूर प्रवास करू शकतात. म्हणूनच महाकुंभ मेळ्याला एवढे लोक जाऊ शकलेत. याबरोबरच रेल्वेच्या सोयी वाढल्या आहेत. विशेष गाड्या आहेतच. वंदे भारतने खूप सोय झाली आहे . **- प्रा. अंजली पळणीकर/नागपूर**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे धोरण मायक्रो ओबीसी– किसवे

## शिवसेनेच्या ओबीसी आघाडीची हिंगोलीत पत्रकार परिषदेत माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे धोरण मायक्रो ओबीसी असून त्यांच्या उन्नतीसाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून राज्यात संवाद दौरा सुरू असल्याची माहीती ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी दिली.

येथील शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे शिवसेनेचे ओबीसी व्हीजेएनटी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी सुयश खर्चे हेमंत भोईटे, योगेश धरम, मंगेश हाके, विठ्ठल बांगर आदी उपस्थित होते. ओबीसी/व्हीजेएनटी से–नेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवेचे संवाद दौरा प्रसंगी बोलतांना म्हणाले की, शिवसेनेसोबत मायक्रो ओबीसी व व्हीजेएनटी यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी, त्यांच्या हिताचे निर्णय सरकार घेईल व त्यांच्या उन्नतीसाठी मोलाचा वाटा उचलेल याचा विश्वास व्यक्त करण्यासाठी त्यांनी राज्यात संवाद दौरा सुरु केला आहे. तसेच राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी समाजातील सर्व जातीतील जनतेला शिवसेनशी घट्ट जूळवून या मतदार संघात संघटनात्मक दौरा करून पक्ष बांधणी मजबूत करण्यात येणार आहे. बाळासाहेब भवन मुंबई येथून राज्य दौऱ्याला सुरुवात करण्यात आली असून यवतमाळ जिल्ह्यात संवाद यात्रा पोहचली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांनी हक्कापासून कायम वंचित असलेल्या मायक्रो ओबीसी व व्हिजेएनटी यांच्या हिताकरीता धडाडीचे निर्णय घेतल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेतून सांगितले.

राज्यात शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक बांधणीचा एक भाग म्हणून, शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे हे मुख्य मंत्री पदावर असतानाच्या कालावधीत राज्यातील धनगर, भटके विमुक्त, ओ. बी. सी., बारा बलुतेदार या समाजाच्या वेग–वेगळ्या जातींच्या कल्याणांचा योजना, आर्थिक उन्नतीच्या महामंडळे, कल्याणकारी शासन निर्णय घेतले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सोलापूर जिल्हाध्यक्ष सुयश कर्चे, सातारा जिल्हाध्यक्ष हेमंत भोईटे, पुणे योगेश धरम, राज्य प्रवक्ते परमेश्वर घोडके उपस्थित होते.

# नगर परिषदेच्यावतीने शहरातील नाले सफाईचे काम वेगात

## शहरातील लहान मोठे नाल्यांची सफाई करणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मे**

येथील नगर परिषदेच्यावतीने शहरातील सखल भागातील मोठे, मध्यम तसेच लहान असे जवळपास ६९ नाले सफाईचे काम नगर पालिकेने युध्दपा–तळीवर हाती घेतले असून जेसीबी मशीनद्वारे ही कामे सुरू करण्यात आली आहेत.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी शहरातील नाल्यांची मान्–सूनपूर्व स्वच्छता करण्याचे आदेश दिल्यानंतर नगर पालिकेचे उपमुख्याधिकारी तथा नगर अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्या पथकांनी शहरातील बावनखोली, पेन्शनपुरा आदी भागात बुधवारी नाले सफाईचे काम युध्दपातळीवर सुरू केले आहे. या भागात मागील वर्षी पावसामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर घरामध्ये पाणी घुसले होते त्यामुळ येथील रहीवाशांच्या जीवनाश्यक वस्तू तसेच साहीत्याचे मोठे नुकसान झाले होते. सदरील भाग नदीच्या काठावर आणि सखल असल्यामुळे या भागात पाणी साचण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे या भागात जेसीबीच्या माध्यमातून मोठे, मध्यम आणि लहान नाल्यांची सफाईचे काम युध्द–पातळीवर सुरू आहे.

शहरात ६९ लहान मोठे नाले असून या सर्व नाल्यांची स्वच्छता करून त्यातील कचरा व इतर पदार्थ काढण्याचे काम करण्यात येत आहे. पावसाळ्यात सखल भागात नाल्या तुंबल्याने पाणी शिरल्यामुळे या भागातील नागरिकांना धोका निर्माण होतो. त्यामुळ दक्षता म्हणून या भागातील नालेसफाई करण्यात येत असल्याची माहीती प्रतीक नाईक यांनी दिली आहे.

# छगन भूजबळांना मंत्रीपद मिळताच समता परिषदेच्यावतीने जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मे**

ओबीसीचे नेते तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ यांची सोमवारी कॅबीनेट मंत्रिमंडळात निवड झाल्याने हिंगोलीत अखिल भारतीय महात्मा ज्योतिबा फुले समता परिषदेच्या वतीने फटाके फोडून पेढे वाटप करून जल्लोष करण्यात आला. यावेळी समता परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष चंदू लव्हाळे यांच्यासह भागवत बोधने, पवन मुळे, अक्षय लव्हाळे, अनिकेत लव्हाळे, राजू पानपट्टे, उमेश धुमाळ, जगन घोडेकर, संग्राम पाटोळे, शिवा मोटे, तुषार बनसोडे, पिंटू ठके, मारुती बनसोडे, सचिन जोगदंड, नामदेव जाधव, संतोष कांबळे, प्रभाकर जाधव, शंकर पुजरवाड, गणेश कोंढाने, रोहित चौधरी, चेतन कोंढाने, स्वराज वाघ, जगन बर्वे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.



**हिंगोली– येथील नगर परिषदेच्या अग्नीशमन दलाच्यावतीने दहशतवाद विरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, कार्यालयीन अधीक्षक शाम माळवटकर, नगर अभियंता प्रतीक नाईक, अभियंता वसंत पूतळे, काकडे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह नगर पालिका, अग्नीशमन दलाचे कर्मचारी उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

# उपविभागीय अधिकाऱ्यांच्या भेटीत सेनगाव ग्रामीण रूग्णालयाचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मे**

उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी बुधवार अचानक सेनगाव येथील ग्रामीण रूग्णालयाला भेट दिली. यावेळी तब्बल २० कर्मचाऱ्यांच्या दोन ते दहा दिवसांपासून हजेरी पटावर स्वाक्षऱ्याच नसल्याचे दिसून आले. पाच कर्मचारी रजेवर असल्याचे सांगण्यात आले. उपस्थित कर्मचाऱ्यांना बरोबर उत्त–रेही देता येत नसल्यामुळे घुटुकडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत सदरील अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार असल्याचा इश–ारा दिला.

उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे बुधवारी दि २१ मे रोजी उपोषणकर्त्याची भेट घेण्यासाठी सेनगाव येथे गेले असता अच–ानक त्यांनी सेनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. परंतु रूग्णालयात जा–ताच अधिकाऱ्यांना अलबेल कारभार दिसून आला. त्याठिकाणी अनेक कर्मचारी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी तातडीने हजेरी रजिस्टर मागविले. त्यात तब्बल २० कर्मचाऱ्यांची मागील २ ते १० दिवसांपासून स्वाक्षरी नसल्याचे दिसून आले. तसेच कर्तव्यावरही दुसरेच डॉक्टर आढळून आले. या प्रकारामुळे घुटुकडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. इतर कर्मचाऱ्यांची माहीती धेतली असता उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना समाधानकारक माहीती देता आली नाही. त्यानंतर घुटुकडे यांनी रूग्णालयाची पाहणी केली असता रूग्णालयात अस्वच्छता दिसून आली. तपासणीच्या रूग्णांची संख्याही कमी असल्याचे दिसून आले. सदर प्रकार त्यांनी जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस यांना कळविला.

अधिकाऱ्यांच्या भेटीमुळे सेनगाव रूग्णालयाचे पितळ उघडे पडले आहे. या रूग्णालयाला सुमारे ४० ते ५० गावे जोडलेली आहेत. अशा अवस्था असेल तर या रूग्णालयाचा ग्रामीण भागातील रूग्णांना फायदा होतो की नाही हा चिंतनाचा विषय आहे. अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणाचे नियंत्रण नसल्यामुळे असे प्रकार घडत असल्याचे रूग्णांचे म्हणणे आहे.

# अहिल्यादेवी कन्या विद्यालय, मॉडर्न उच्च माध्यमिक विद्यालयातील गुणवंतांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २१ मे**

येथील अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालय, येथे इयत्ता दहावीच्या व मॉडर्न उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता १२ वीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सो–हळा संपन्न झाला.

या निमित्त आयोजित कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे अध्यक्ष प्रा. बी.डी. कदम, तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव विक्रम शिंदे, इंदिरा गांधी कन्या विद्यालय जवळा बाजार चे अध्यक्ष मुरलीधररावजी मुळे, संस्थेचे सह सचिव गजानन मुळे, संदीप कदम, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सरिताताई पतंगे,प्रभारी प्राचार्य सौ. संध्या कातोरे, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ. शिंदे शामल उप–स्थित होते.

यावेळी इयत्ता दहावी व इयत्ता बारा–वी परीक्षा मधील सर्व गुणवंतांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

मॉडर्न उच्च माध्यमिक विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवत १७ व्या वर्षी गुणवत्ता कायम राखत कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत सरासरी प्रथम ठरले. विद्यालयाचा सरासरी निकाल ९७.०० % असून वाणिज्य शाखेचा निकाल १००%,विज्ञान शाखेचा निकाल.१००%, कला शाखेचा निकाल ९७% एव्हढा लागलेला आहे. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.सरिता शिवाजीराव पतंगे, इंदिरा गांधी कन्या विद्यालयाचे अध्यक्ष मुरलीधर रावजी मुळे, संस्थेचे सहसचिव श्री गजानन मुळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी सानिका गुंडले, मयुरी थोरात, लोखंडे या विद्यार्थिनींनी आपली मनोगत व्यक्त केली. अध्यक्षीय समार–ोप विद्यालयाचे अध्यक्ष प्रा. बी.डी. कदम केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिटकर एल्लाप्पा यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

# औंढा नागनाथ तहसील कार्यालयात मान्सूनपूर्व आढावा बैठक, आपत्ती व्यवस्थापन सतर्क



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २१ मे**

औंढा नागनाथ येथील तह–सील कार्यालयात तहसीलदार हरिष गाडे यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय मान्सूनपुर्व तयारी आढावा बैठक २० मे सोमवार रोजी घेण्यात आली. सद–रील बैठकीस नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, नायब तहसी–लदार अनिता कोलगणे,पोलिस निरीक्षक जी एस राहिरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ गजानन चव्हाण, शाखा अभियंता एच बी इंगळे, कृषी अधिकारी करण पवार, विस्तार अधिकारी एस आमले, नगरपंचायतचे महादेव घुगसे, मंडळ अधिकारी आशा गिते, प्रभाकर काळे, रंगनाथ म्हेत्रे, उंकडी मारकड सर्जेराव पंडित यांची उपस्थित होते. नगरपंचायत, पंचायत समिती, कृषी विभागाचे अधिकारी यांनी आपले मान्–सून पुर्व कृती आराखडा तयार करून सर्व कर्मचारी यांची संपुर्ण नाव पदनामासह भ्रमणध्वनीची माहिती सात दिवसात देण्यासाठी सांगितले.तसेच आपत्कालीन व्यवस्थापन करून संबंधित कार्यालयात चोवीस तास मदत कक्ष स्थापन करून तीन टप्प्यांमध्ये कर्मचारी यांच्या नेमणुकीचे आदेश काढावेत तसेच जनतेला संपर्क साधण्यासाठी सोयीचे फोन नंबर दिसत्या ठिकाणी लिहावे अशा सुचना दिल्या. आपत्कालीन व्यवस्थापनामध्ये कोणीही कुचराई करणार नाही याची दक्षता घ्यावी असे ही निर्देश तहसीलदार हरिष गाडे यांनी दिले आहेत.

# मागील पाच दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडीत, उबाठा शिवसेनेचा रास्ता रोकोचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मे**

औंढा नागनाथ तालुक्यातील रामेश्वर, साळणा व रुपुर ३३ के व्ही अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमध्ये मागील पाच दिवसापासून विद्युत पुरवठा नसल्याने शिवसेना (उबाठा)व शेतकऱ्यांच्यावतीने तहसील कार्यालयात बुधवारी दिनांक २१ रोजी सकाळी ११ वाजता निवेदन देण्यात आले आहे.



सदरील निवेदन अव्वल कारकून संगीता बामनपल्ले यांनी स्वीकारले आहे. सद–रील निवेदनात सविस्तर वृत्त असे आहे की, रामेश्वर, साळणा व रुपुर ३३ केव्ही अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमध्ये मागील पाच दिवस–ापासून विद्युत पुरवठा बंद आहे.३३ केव्ही जिंतूर येथून वीज पुरवठा आहे. परंतु वारंवार जिंतूर वरून विजू पुरवठा बंद होत आहे. तसेच लाईनमनची संख्या अपुरी असल्याम–ुळे अनेक गावामध्ये पोल वाकून पडले असल्यामुळे त्यांची दुरुस्ती रखडली आहे .तसेच टाकळखोपा येथे १३२ के व्ही मंजूर असून त्यांचे अद्याप काम सुरू झालेले नाही. टाकळखोपा येथील काम लवकरात लवकर सुरू करावे. मागण्याचे निवेदन महावितरणकडे पाठवून त्वरित मागण्या मान्य कराव्यात अन्यथा शिवसेना (उबाठा )व शेतकऱ्यांच्यावतीने रामेश्वर येथे २६ मे रोज सोमवार रोजी सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल,असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुकाप्रमुख माऊली उर्फ ज्ञानेश्वर झटे, बबनराव इघारे, तानाजी मोरे, देविदास मोरे, एल आर वैद्य, शेकुजी गारकर, रामेश्वर गारकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# येळी घाटावरील कारवाईतुन दोन हायवा,चार बोटी गायब!

## स्थानिक गुन्हे शाखेने केली लाखोंची तोडपाणी ?

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे-**

नांदेड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नुकत्याच लोहा तालुक्यातील एक घाटावर केलेल्या कारवाईतून लाखोंची उलाढाल केली असल्याची चर्चा आहे या कारवाईतून स्थानिक गुन्हे शाखेने दोन हायवा, चार बोटी गायब केल्याचे विश्वसनीय वृत्त असून या कारवाईची जिल्हा पोलीस अधीक्षकांनी चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि. २० मे रोजी उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोटगाव, येळी, चिंचोली धडाकेबाज कारवाई करत २ कोटी ५८ लाख रुपयांचे साहीत्य जप्त केला होते. परंतु स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई केवळ कमाईसाठी होती अशी चर्चा सुरू आहे. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई दमदार केली असली तरी या कारवाईत त्याच पद्धतीने दमदार अशी आर्थिक उलाढालही केली असल्याची चर्चा पोलीस दलात तसेच रेती माफियामध्ये होत आहे. येळी रेती घाटावर केलेल्या कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने तीन हवा आणि एक टिप्पर तसेच चार फायबर जप्त केले होते यापैकी



केवळ हायवा क्रमांक एमएच २६ एडी २६६९ व टिप्पर क्रमांक एमएच १२ इएफ ७६८४ जप्त केले तर लाखोंची आर्थिक उलाढाल करून हायवा क्रमांक एमएच २६ बीई ३७९० व टीजी १७ टी ०१२८ सोडून देण्यात आले. जप्त न केलेली ही दोन्ही वाहने दिवसभर वाळू घाटावर होती. हायवा वाहनाप्रमाणेच चार बोटी जप्तीमध्ये न दाखवता त्या पाण्यात बुडण्यात आल्या. या कारवाईच्या माध्यमातून स्थानिक गुन्हे शाखेने आर्थिक उलाढाल केली असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. विशेष म्हणजे या कारवाईत पोलिसांना रेती उपसा, वाहतुक करताना कोणीच आढळुन आले नाही असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पथकाने केवळ साहीत्य जप्तीची कारवाई केली. पोलीसांनीच दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातच आरोपींचे नावे नसुन केवळ साहीत्य जप्तीची आकडेवारी नमुद असल्याने संशय व्यक्त होत आहे तर या कारवाईची चर्चा केवळ रेतीमाफीयाच नव्हे तर पोलीस दलात देखील सुरू आहे.

दरम्यान शहर परीसरातुन माठ्या प्रमाणात रेती वाहतुक होत असुन ऐन पावसाळ्याच्या तोंडावर अवैध रेती उपसा वाहतुकीवर कारवाई करत आर्थिक उलाढाल केल्याची चर्चा आहे. राजकिय दबाबापोटी पोलिसांनी येथील रेती माफियांना कारवाई न करता पुन्हा रेती उपसा वाहतुक करण्यास पाठबळ दिले असुन या कारवाईची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

# विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. २१ मे-**

चारित्र्यावर संशय घेवून दारु पिऊन सतत मारहाण करत सासरच्या मंडळींच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून एका विवाहितेने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. २० रोजी मंगळवारी लोहा येथे घडली असून विवाहितेच्या भावाच्या फिर्यादीवरून नवऱ्यासह सासूसासऱ्याविरूध्द तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

मयत विवाहिता उषा राहणार घोळवा तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली हीचे लग्न लोहा तालुका हदगाव येथील दिनेश अशोक गायकवाड यांचेसोबत सात वर्षापूर्वी झाले होते. लग्नानंतर काही वर्ष त्यांचा संसार सुखात चालला होता. दरम्यान त्यांना दोन मुलं झाली. परंतु त्यांच्या सुखी संसाराला कोणाची दृष्ट लागली. मयत विवाहिता उषा दिनेश गायकवाड (वय २४) हिला तिचा पती आरोपी दिनेश अशोक गायकवाड (वय ३०), सासरा अशोक खोब्राजी गायकवाड (वय ५०) व सासू पुण्यरथाबाई अशोक गायकवाड (वय ४५) सर्व राहणार लोहा तालुका हदगाव ही सासरची मंडळी उषाला सतत चारित्र्याच्या संशयावरून त्रास देत होते. तिचा मानसिक व शारिरीक छळ करीत होते. नवरा दररोज दारु पिऊन मयत विवाहितेला मारहाण करीत होता. परंतु आज ना उद्या हा त्रास कमी होईल व तिला चांगले नांदवतील या भावनेतून ती होणारा त्रास तसाच सहन करीत होती. परंतु तिचा त्रास काही केल्या कमी होत नव्हता. शेवटी विवाहिता उषा हीने सततच्या त्रासाला कंटाळून आपल्या राहत्या घरी दि. १९ रोजी सोमवारी गळफास घेऊन आत्महत्या केली. तिच्या मृत्यूस पती व सासु सासरे कारणीभूत असल्याची मयत विवाहितेचा भाऊ मारोती सखाराम पोटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि. २० रोजी तामसा पोलीस ठाण्यात कलम १०८, ३ (५) बीएनएस. नुसार पती सासुसासरे यांचेविरूध्द गुन्हा दाखल झाला असून पती दिनेशला पोलिसांनी अटक केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांचे मर्गदरहनाखाली फौजदार बालाजी नरवटे करीत आहेत. तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक हे करीत आहेत. भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी भेट देऊन तपासाच्या दृष्टीने सुचना केल्या.



**भोकर - भारतीय जनता पार्टीच्या महानगर जिल्हाध्यक्ष पदी माजी आ.अमर राजूरकर यांची निवड झाल्याबद्दल भोकर येथील नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष शेख यूसूफभाई यांनी नूकतीच भेट घेतली व शाल पूष्पगूच्छ देवून राजूरकर यांचा सत्कार करुन पूढिल कार्यास राजूरकर यांना शूभेच्छा देण्यात आल्या शेख यूसूफभाई यांचे सोबत भोसी येथील प्रगतशील शेतकरी नंदकिशोर गायकवाड ॲड. विनोद चव्हाण चिदगीरीकर यांचेसह अनेकजण उपस्थित होते.**

# एकही पात्र व्यक्ती घरकुल लाभापासुन वंचीत राहता कामा नये!

## आमदार राजेश पवार यांचे पंचायत समिती प्रशासनाला निर्देश

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २१ मे-**

भारतात एकही कुटूब बेघर राहता कामा नये यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात मोठ्या प्रमाणात घरकुलाला मंजुरी देत आहेत. नुकतेच पंतप्रधान आवास योजना टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण व शहरी भागात घरकुल वंचित कुटूंबाला घरकुल देण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे प्रक्रिया सुरू आहे. हा सर्वेक्षण काटेकोरपणे करण्यात यावे;जेणेकरून कोणताही गरजू नागरिक या योजनेपासून वंचित राहणार नाही.कोणी कर्मचारी या कामात कुचराई करेल तर त्यांच्या विरुद्ध कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश आ.राजेश पवार यांनी पंचायत समिती प्रशासनाला दिले आहेत.



पंतप्रधान आवास योजनेच्या सर्वेक्षणाचा आढावा घेण्यासाठी आ.राजेश पवार यांनी शुक्रवारी दुपारी सव्वा तीन वाजता आयोजित केलेल्या ऑनलाईन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला माजी जि.प.सदस्या पुनमताई पवार , जिल्हा परिषदेचे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, नायगाव विधानसभा मतदारसंघातील तीनही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी ,ग्रामसेवक आदी कर्मचारी सामिल होते.

बैठकीच्या प्रारंभी पंतप्रधान आवास योजनेच्या या सर्वेक्षणाचा नायगाव ,उमरी, धर्माबाद या तीन तालुक्याचा चालु परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर बैठकीला संबोधित करताना आ.राजेश पवार यांनी सर्वे क्षणामध्ये अधिक गती आणण्याची सूचना केली. पंतप्रधान आवास योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना असून, या योजनेच्या माध्यमातून बेघरांना तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या गरजू नागरिकांना पक्क्या घराची सुविधा उपलब्ध होते. त्यामुळे कोणताही गरजू व पात्र नागरिक या सर्वेक्षणातून वंचित राहता कामा नये, या योजनेकरिता अर्ज करण्याची अंतिम तारीख दोन आठवड्यानी वाढली असुन ३१ मे २०२५ आहे. त्यामुळे राहिलेल्या दिवसांत प्रशासनाने अधिक व्यापक स्तरावर जनजागृती व सर्वेक्षण करावे, असे निर्देशही आ.राजेश पवार यांनी यावेळी दिले.

पुढे बोलताना आ.पवार म्हणाले आतापर्यंत घरकुलाचा लाभ भेटला नाही . असे अनेक व्यक्ती कुटूंबाची उपजिवीका भागण्यासाठी कामाच्या शोधात पुणे , मुंबई , संभाजीनगर ( औरंगाबाद ) हैदराबाद , निजामाबाद आदी ठिकाणी गेले आहेत .त्या व्यक्तीना ग्रामसेवक सरपंच या दोघांनी सुचना देऊन बोलावून घ्यावे व त्याचे पण गावात राहुन सुध्दा अनेक कुटूंब बेघर व कच्या घरात राहतात त्यानां पण लाभ भेटला नाही असा कुटूंबाचे घरकुल सर्वेक्षण करून घ्यावे . तारीख वाढली असली तरी प्रत्येक ग्रामसेवक सतर्क राहुन घरकुल सर्वेक्षण करावे .या लाभापासून एकही कुटूंब वंचित राहता कामा नये अशा सुचना देत तीनही तालुक्यातील गटविकास अधिका-यांना तालुक्यात दररोज किती सर्वेक्षण झाले यांची माहीती कळवावे असे आ.पवार यांनी सागितंले आहे विशेषता ग्रामविकास अधिकारी कर्मचारी त्यांच्या सर्वे करणाऱ्या टिमचे आ राजेश पवार यांनी आभार व्यक्त केले आहे .

## संक्षिप्त वृत्त

### बेवारस दुचाकी वाहानचा लिलाव करणार ,ओळखीचा पुरावा देऊन वाहन घेऊन जावे

**लोहो**- पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये विविध गुन्ह्यात सापडलेल्या बेवारस दुचाकी वाहन अनेक दिवसांपासून पोलिस स्टेशन आवारात पडून आहेत. बेवारस दुचाकी वाहानची ओळख करून दोन दिवसात वहान ताब्यात घ्यावे अन्यथा ठाणे आवारातील वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी अहवान केले आहे असे ठाण्यातील गुप्त शाखेचे कैलास गिरी यांनी माहिति दिली.पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात विविध प्रकारच्या गुन्ह्यात सापडलेल्या अनेक दुचाकी वाहने आहेत. मागील बऱ्याच दिवसापासून या दुचाकीची व दुचाकीच्या मालकाची ओळख पटलेली नाही. त्यामुळे सदर दुचाकी वहान पोलीस स्टेशनच्या आवारात जमा करण्यात आलेल्या आहेत बेवारस वाहनांची दोन दिवसाच्या आत स्व:ताची व नातेवाईकांची असल्यास त्या वाहन मालकी हक्काचा पुरावा व ओळख पत्राचा पुरावा दाखवून वाहन घेवून जावेत अन्यथा वाहनाचा लिलाव करण्यात येणार असल्याचे गुप्त शाखेने माहिती दिली पोलिस ठाणे आवारात जप्त करण्यात आलेली वाहने उभी असल्याचे दिसत असून या वाहनांचा लवकरच लिलाव करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी अहवान केले यासाठी हेडकॉन्स्टेबल सदाशिव जामकर, नारायण कदम यांच्याकडे संपर्क करुन पुरावे गोळा करुन वाहान ताब्यात घ्यावे असे अहवान केले आहे.




### मुदखेड तालुक्यातील दिव्यांग बांधवांचे ५ टक्के निधी वाटप करा: प्रहार संघटना



**मुदखेड** -मुदखेड तालुका प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन सुद्धा दिव्यांग बांधवांना अद्यापही ५ टक्के निधी पुर्ण वाटप करण्यात आले नाही. ५ टक्के निधी का वाटप केला नाही याचे कारणही दिव्यांग बांधवांना सांगत नाहीत. म्हणुन बच्चुभाऊ कडु समर्थक प्रहार तालुका मुदखेड च्या वतीने दि. १९ मे रोजी पंचायत समिती कार्यालय मुदखेड व नगरपरिषद कार्यालय मुदखेड येथे दिव्यांग बांधवांचा ५ टक्के निधी लवकरात लवकर मुदखेड शहर व तालुक्यातील सर्व ग्राम पंचायत मध्ये येत्या १५ दिवसात ५ टक्के निधी वाटप करण्यात यावा. निधी वाटप न केल्यास प्रहार स्टाईल ने अंदोलन छेडण्यात येईल असा ईशारा गटविकास अधिकारी पंचायत समिती मुदखेड व मुख्याधिकारी नगरपरिषद यांना प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.यावेळी प्रहार सेवक अनिल पाटिल शेट्टे, प्रहार तालुकाप्रमुख माधव पांचाळ सरेगावकर, मारोती पांचाळ,उमाकांत आडणे,मारोती गुडमलवार, कोटेवाड, व सर्व प्रहार कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉ.नामदेवराव कराड यांचे निधन

**किनवट-** बोधडी खुर्द येथिल प्रतिष्ठीत जेष्ठ नागरीक डॉ.नामदेवराव व्यंकोबा कराड यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी दीर्घ आजाराने २० मे च्या रात्री ११.३० वाजताचे दरम्यान निधन झाले असून आज (२१ मे २०२५) दुपारी ११.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, दोन सुना, नातवंड, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेत किनवट, माहूर, तेलंगणा राज्यातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता. चिरंजीव विष्णू कराड यांनी अग्नीसंस्कार दिला. दरम्यान शोकसभा संदेशातून किनवटचे आमदार भीमराव केरामांसह मान्यवरांनी डॉ.नामदेवराव कराडांच्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकला होता. डॉ.कराड हे किनवट पंचायत समितीचे दिवंगत माजी सभापती व्यंकोबा कराड यांचे चिरंजीव होते. फिरत्या पथकाचे सहायक पशुधन विकास अधिकारी म्हणून त्यांनी सेवा बजावली. जेष्ठ नागरीक संघामध्ये तालुका, जिल्हा आणि मराठवाडा स्तरावर त्यांच्याकडे महत्वाची जबाबदारी सोपवली होती. बोधडी खुर्द ग्रामचायतीत उपसरपंच म्हणून सद्यस्थितीत होते. भाजपामध्येही त्यांनी महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या. सेवानिवृत्तीपासून डॉ.कराडांनी समाजकार्याला वाहून घेतले होते हे विशेष.



# एकाच दिवशी २ सराईत गुन्हेगारांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त (अं व द) प्रसाद सुर्वे, राज्य उत्पादन शुल्क मुंबई, विभागीय उपआयुक्त नांदेड विभाग बी.एच.तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अतुल कानडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त आदेशानुसार मंगळवार २० मे रोजी रमेश लक्ष्मण गड्डमवार व रामदास जालमसिंग येरवाळ यांना स्थानबध्द केले आहे.

मुदखेड येथील रमेश लक्ष्मण गड्डमवार (वय ५१ वर्षे) हा वारंवार क्लोरल हायड्रेट हे घातक रसायन मिश्रित बनावट ताडी विक्री करताना आढळून आला होता. या इसमाकडून महाराष्ट्र दारुबंदी गुन्ह्याच्या कलम ९३ अंतर्गत उपविभागीय दंडाधिकारी भोकर यांनी एका वर्षाच्या कालावधीसाठी चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेतले होते. तरी या इसमाने त्याच्या वर्तणुकीत सुधारणा न आणता वारंवार क्लोरल हायड्रेट हे घातक रसायन मिश्रित बनावट ताडी विक्री करीत असल्याने त्याच्या विरुध्द अनेक गुन्हे नोंद केले आहेत. त्याअनुषंगाने निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भोकर यांनी या कार्यालयामार्फत सादर केलेल्या एमपीडीए प्रस्तावास जिल्हाधिकारी नांदेड यांनी २० मे रोजी मान्यता देवून स्थानबध्दतेचे आदेश पारित केले. या आदेशानुसार या इसमाची छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

किनवट तालुक्यातील बोधडी येथील रामदास जालमसिंग येरवाळ (वय-३५ वर्षे) हा वारंवार अवैध हातभट्टी दारु निर्मिती, विक्री करतांना आढळून आला होता. या इसमाकडून महाराष्ट्र दारुबंदी गुन्ह्याच्या कलम ९३ अंतर्गत उपविभागीयदं डाधिकारी किनवट यांनी एका वर्षाच्या कालावधीकरिता चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेतले होते. तरी ही या इसमाने त्याच्या वर्तणुकीत सुधारणा न-आणता वारंवार अवैध हातभट्टी दारुनिर्मिती, विक्री करित असल्याने त्याच्या विरुध्द अनेक गुन्हे नोंद केले आहेत. त्याअनुषंगाने निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क किनवट यांनी या कार्यालयामार्फत सादर केलेल्या एमपीडीए प्रस्तावास जिल्हाधिकारी नांदेड यांनी २० मे २०२५ रोजी मान्यता देवून स्थानबध्दतेचे आदेश पारित केले आहेत.

# सिद्धार्थ महाविद्यालय आणि शिक्षण प्रबोधिनी महाविद्यालयास नॅक दर्जा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मे-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड संलग्नित २००९ पासून पत्रकारिता क्षेत्रात दर्जेदार विद्यार्थी घडवण्याचं काम करत असलेल्या सिद्धार्थ महाविद्यालय आणि शिक्षण प्रबोधिनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, वसरणी, नांदेड या महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन संस्था बंगलोर द्वारा आज रोजी क दर्जा प्रदान करण्यात आला.



मूल्यांकन परिषदेमार्फत मूल्यांकनात सिद्धार्थ महाविद्यालय आणि शिक्षण प्रबोधिनी नांदेड येथे दि. ०८ आणि ०९ मे रोजी मूल्यांकन समिती उपस्थित होती त्यात अध्यक्ष : डॉ.आनंद शर्मा (प्र.कुलगुरू, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ वर्धा.), समन्वयक सदस्य :- सुमन पौल(प्रोफेसर), डॉ.प्राचार्य शिबा पी. (सदस्य) डॉ. बी. एस. पोणमुदिराज (नॅक समन्वयक) हे होते. सदरील समितीने ऑनलाइन स्वरूपात महाविद्यालयाचे प्रत्येक निकषांच्या आधारे तपासणी करून सतत ०२ दिवस मूल्यांकन केले. या मूल्यांकनाच्या आधारे महाविद्यालयास दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

सदरील यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप आनंदराव गोणारकर, संस्थेचे कार्यवाहक डॉ.पंचशील केशवराव एकंबेकर, सचिव प्रेषित एकंबेकर, संस्थेचे पदाधिकारी डॉ. प्रवीण शिंदे, डॉ. विश्वलक्ष कालेकर, रोशनी ढवळे, डॉ. संजीवकुमार केशवराव एकंबेकर, सुनील गणपतराव ढवळे इत्यादींचे सहकार्य लाभले.

महाविद्यालयाच्या आयक्यूएससी समन्वयक प्रा.संचिता केळकर, कार्यालयीन कर्मचारी प्रेमदास वाघमारे प्रा.गजेंद्र टोम्पे आणि इतर सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# विर शिरोमणी महाराणा प्रताप जयंती निमित्त हर्षुताई ठाकुर यांचे २८ रोजी माहूरला व्याख्यान

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २१ मे-**

शुरविर शिरोमणी हिंदूसूर्य महाराणा प्रताप सिंह सिसोदिया यांची २९ मे गुरुवार रोजी पंचांगानुसार देशभरात जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्यानुसार माहूर शहरात महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यात येणार असून, यानिमित्ताने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तर पूर्वसंध्येला २८ रोजी बुधवारी हिंदू शेरनी, रणरागिणी, प्रखर हिंदुत्ववादी वक्ता हर्षुताई ठाकुर, हिंदूराष्ट्र सेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख, छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रखर वाणीतून कपिलनगर येथील कपिलेश्वर मंदिरच्या प्रांगणात संध्याकाळी ७ वाजता महाराणा प्रताप यांच्या जीवनावर सुश्राव्य व्याखानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



शुरविर शिरोमणी हिंदूसूर्य महाराणा प्रताप सिंह सिसोदिया यांची दरवर्षी दोन वेळा जयंती साजरी करण्यात येते. पहिली इंग्रजी कॅलेंडर नुसार ९ मे रोजी आणि दुसरी हिंदू पंचांगानुसार.

हिंदु पंचांगानुसार ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीया तिथीला महान योध्दा महाराणा प्रताप यांचा जन्म झाला होता. त्यानुसार माहूर येथील विर शोरोमणी महाराणा प्रताप चौकातील नामफलकावरील महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करत साध्या पद्धतीने मोठ्या उत्साहात राजपूत समाजातील नागरिकांनी ९ मे रोजी महाराणा प्रताप यांची जयंती साजरी केली.

तर,हिंदू पंचांगानुसार यावर्षी महाराणा प्रताप यांची जयंती २९मे रोजी सर्वत्र साजरी करण्यात येणार असून, माहूर येथे विर शिरोमणी महाराणा प्रताप सार्वजनिक जन्मोत्सव समिती माहूरगड-२०२५ च्यावतीने महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने २९ मे रोजी शहरातील कपिलेश्वर मंदिर येथून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तर त्याआधी २८ रोजी पूर्वसंध्येला ७वाजता कपिलेश्वर मंदिर प्रांगणात हिंदू शेरनी, रणरागिणी, प्रखर हिंदुत्ववादी वक्ता हर्षुताई ठाकुर हिंदुराष्ट्र सेना महिला आघाडी प्रमुख छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रखर आणि ओघवत्या वाणीतून महाराणा प्रताप यांच्या जीवनचरित्रावर आधारित सुश्राव्य व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरासह तालुका व परिसरातील सर्वधर्मिय नागरिकांनी २८ मे रोजी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रखर व्याख्याता हर्षुताई ठाकुर यांचे महाराणा प्रताप यांच्या जिवनचरित्रातून विररस जागवणाऱ्या व्याख्यानाचा लाभ घ्यावा दुसऱ्या दिवशी २९ रोजी महाराणा प्रताप जयंती निमित्त निघणाऱ्या भव्य शोभायात्रेत सहभागी व्हावे,असे आवाहन आयोजक विर शिरोमणी महाराणा प्रताप सार्वजनिक जन्मोत्सव समिती माहूरगड-२०२५ चे अध्यक्ष विजयसिंह हजारी, उपाध्यक्ष पवन शर्मा, सचिव महेंद्रसिंह बैस यांचेसह समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# तिरंगा रॅलीतून देशप्रेमाचा जागर ; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, शौर्यगाथेला सलाम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २१ मे-**

काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी देशावर केलेल्या कायरतापूर्ण हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करत तसेच भारतीय सैन्याच्या 'ऑपरेशन सिंदूर' या धाडसी कारवाईला समर्थन दर्शवत किनवट शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागवण्याचा उद्देश बाळगण्यात आला होता.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अण्णाभाऊ साठे चौक मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये आमदार भिमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एन.सी.सी. कॅडेट्स, महिलांचे समूह, विविध क्षेत्रातील पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, वकील अशा सर्वच घटकांचे प्रतिनिधीत्व या रॅलीत दिसून आले. सर्वांच्या हातात तिरंगा झळकत होता आणि देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले.



रॅलीचा समारोप अण्णाभाऊ साठे चौकात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी भारतीय लष्कराच्या शौर्याला सलाम करत, देशाच्या संरक्षणासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. कॅप्टन आनंद जाधव, मेजर तुकाराम मासिदवार, मेजर मस्तान शेख, मेजर राजाराम बतुलवार, मेजर अशोक सिडाम, मेजर बळीराम कुडमते, मेजर भगवान मोरे, मेजर उल्हास राठोड, मेजर रामदास पवार, मेजर विजय मिरासे, मेजर नामदेव जाधव, मेजर राम मोहन रेड्डी, मेजर रत्नाकर मैंद, मेजर प्रमोद पोहरकर, मेजर साहेबराव चव्हाण, मेजर रामदास गुट्टे आणि मेजर पत्की यांचा सत्कार आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांना आणि सहभागी नागरिकांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. संपूर्ण शहरात तिरंगा झेंड्यांनी सजलेले दृश्य देशभक्तीचा जागर करत होते. भारत माता की जय, जय जवान जय किसान, वंदे मातरम अशा घोषणांनी वातावरण भारले होते.

या रॅलीमधून सर्व जातिधर्माच्या नागरिकांनी एकत्र येत देशावर आलेल्या संकटाच्या विरोधात एकात्मता आणि ऐक्य दाखवले.आम्ही सर्वजण एक आहोत आणि देशावर आलेल्या कोणत्याही संकटाला तोंड देण्यास सज्ज आहोत हा महत्वाचा संदेश या रॅलीने दिला.

रॅलीमुळे देशप्रेमाची भावना उंचावली असून, भारतीय सैन्याच्या शौर्याला आणि बलिदानाला जनतेकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे चित्र शहरात दिसून आले. अशा उपक्रमांमुळे युवा पिढीमध्ये देशभक्तीची नवी ज्योत निर्माण होत असून, देशासाठी एकत्र उभे राहण्याची प्रेरणा दिली गेली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### छगन भुजबळ यांच्या शपथविधीचे पाथरीत पेढे वाटून स्वागत !



**पाथरी -** अखिल भारतीय समता परिषदेचे अध्यक्ष तथा ओबीसी नेते राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी उपमुख्यमंत्री यांची मंत्रिमंडळात वर्णी लागल्याबद्दल पाथरी येथे ओबीसी कार्यकर्त्यांकडून फटाके वाजवून तसेच पेढे वाटून स्वागत करण्यात आले.

माजी उपमुख्यमंत्री असलेले छगन भुजबळ यांची विधानसभा निवडणुकीनंतर मंत्रिमंडळात वर्णी न लागल्याबद्दल सर्व ओबीसी कार्यकर्त्यांमध्ये त्यांना डावलल्याबद्दल नाराजी होती. जहाँ नही चैना वहां नही रहना अशी खुद्द भुजबळ यांनी अनेक वेळा आपली नाराजी व्यक्त केली होती त्या नाराजीचा पक्षाला फटका बसू नये म्हणून येणाऱ्या जिल्हा परिषद ,पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर त्यांना मंत्रिपदाची शपथ देऊन ती नाराजी दूर करण्यात आली असून या निर्णयाचे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते रंगनाथ विरकर , विश्वंभर गिराम ,आबासाहेब कोरडे, शेख इम्रोज व इतर असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी भवन समोर फटाके फोडून तसेच एकमेकांना पेढे भरून आनंद व्यक्त करण्यात आला.

### शासकीय तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर : अभाविप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय जिंतूर येथे मागील काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील विविध समस्यांबाबत आंदोलन केले होते. या समस्यांचे समाधान झालेले नाही, तर एक नवीन प्रकरण समोर आले आहे. वसतिगृहात खानावळ नसल्यामुळे विद्यार्थ्यांना ज्यावेळी खाद्य मिळवण्यासाठी बाहेर जावे लागले, त्यावेळी रात्रीच्या वेळी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना तृतीय वर्षातील व बाहेरच्या विद्यार्थ्यांनी बेजबाबदारपणे मिरवणुकीत भाग घेऊन मारहाण केली. यामध्ये विद्यार्थ्यांना काठीने लाथा आणि बुक्क्यांनी जबर मारहाण करण्यात आली.



या घटनेच्या संदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) ने महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निवेदन देऊन संबंधित विद्यार्थ्यांविरुद्ध तात्काळ कार्यवाही करण्यात यावी आणि वसतिगृहात खानावळ सुरू करण्यात यावी अशी मागणी केली आहे. अभाविप जिल्हा संयोजक मुक्तेश भंडारे यांनी याबाबत माहिती दिली.

अभाविप प्रदेश सहमंत्री सुशांत एकोर्गे यांनी यावेळी म्हटले की, ''या घटनेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः विद्यार्थ्याला जेवणासाठी जात असताना करण्यात आलेली मारहाण अतिशय निंदनीय व चिंताजनक आहे. अशा गुंड प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांवर तत्काळ कार्यवाही करण्यात यावी.वसतिगृहात खानावळ नसल्यामुळे विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागते. मागच्या काही दिवसांपूर्वी विद्यार्थी परिषदेतून आंदोलनाच्या माध्यमातून मागणी केली होती, तरीही महाविद्यालय प्रशासनाने खानावळ सुरू केली नाही. वसतिगृहात विद्यार्थी सुरक्षित नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची मानसिकता ताणलेली आहे.विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही प्रशासनाची जबाबदारी आहे. प्रशासनाने तात्काळ ठोस उपाययोजना कराव्यात अन्यथा विद्यार्थ्यांच्या तीव्र रोषास सामोरे जावे लागेल.

### शेतकऱ्यांनी डिएपी खतास पर्यायी खते वापरावीत

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सध्या पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेक-यांकडून जास्त मागणी आहे. डिएपी खतामध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद हे अन्नद्रव्य आहेत. डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डिएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद १६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो.

त्याच बरोबर टिएसपी या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरिप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकरी बांधवाना करण्यात येत आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# जीव गेला तरी बेहत्तर, पण उड्डानपूल करून घेणारचं - किशनराव भोसले

## उड्डाणपूल संघर्ष समितीचा सामूहिक निर्धार

**मोहन धारासूरकर**

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** शहरातील वाहतुक कोंडी हा मोठा चिंतेचा विषय आहे. त्याचा फटाका सर्वांनाचा बसतो. अबालवृध्द, जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिलांसह अनेक घटकांना वाहतुक कोंडींचा सामना करावा लागतो. त्यात रेल्वे फाटक बंद होणे, ही मोठी डोकेदुखी आहे. परिणामी, शहराच्या चौफेर प्रत्येक रस्त्यांवर वाहानांच्या लांबच लांब रांगा लागतात. दररोज होणाऱ्या या त्रासाला शहरवासीयांसह तालुक्यातील जनता आणि वाहनधारक वैतागले आहेत. त्यामुळे स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केंद्रात पाठपुरावा केला होता. अखेर, त्या पाठपुराव्यास चांगले यश आले असून शहरात भव्य उड्डानपूल मंजूर झाला आहे. परंतु, त्या प्रस्तावित उड्डानपूलास काही विकास विरोधी मंडळींनी विरोध केला आहे. त्यांच्याकडून जनतेची सातत्याने दिशाभूल केली जात आहे. मात्र, आम्ही सुध्दा त्यांचे बाप आहोत. त्यांच्या नाकावर टिच्चून उड्डानपूल करून घेऊ. त्यात जीव गेला तरी बेहत्तर, पण उड्डानपूल करून घेणारचं, असा निर्धार उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य किशनराव भोसले यांनी केला. शहरातील प्रस्तावित उड्डानपूलाच्या समर्थनार्थ आयोजित भव्य मोर्चास संबोधित करताना ते बोलत होते. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रल्हाद मुरकुटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव भोसले, जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, इक्बाल चाऊस, माजी नगरसेवक नंदकुमार पटेल, जेष्ठ व्यापारी सुभाष नळदकर, गंगाधरराव पवार, मनोज मुरकुटे, तुकाराम तांदळे, बालाजी मुंडे यांच्यासह अनेकांनी मनोगते व्यक्त करून सर्वसामान्य जनतेच्या भावना मांडल्या. शेवटी, स्थानिक तहसीलदार उषाकिरण शृंगारे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उड्डानपूलाचे समर्थन करणारे लेखी निवेदन देण्यात आले. तत्पूर्वी, दिलकश चौक ते तहसील कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये शहरासह तालुक्यातील हजारो नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी अरे कोण म्हणतंय होणार नाही, केल्याशिवाय राहाणार नाही!, गुट्टे साहाब तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं! यासह विविध घोषणांनी सगळा परिसर अगदी दणाणून गेला होता.



२०२४ साली मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रेल्वे सुरक्षा अंतर्गत शहरातील तहसील कार्यालयाच्या जवळ कोद्री-अकोली रोडवर उड्डाणपुल मंजुर झाला आहे. विशेष म्हणजे या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची निविदा सुध्दा प्रसिध्द झाली आहे. परंतु, काही राजकीय लोकांनी विकासात आडथळा आणण्यासाठी या कामात तांत्रिक अडचणी निर्माण केल्या आहेत. त्यामुळे विकासाला प्राधान्य देत आम्ही शहरवासीय व तालुक्यातील सर्वसामान्य जनता आणि वाहनधारकांच्या वतीने उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीची स्थापना केली आहे. त्या माध्यमातून आमचा उड्डानपूलास जाहीर पाठींबा आहे. शहरातील रेल्वे गेटच्या दक्षिणेच्या बाजुस गंगाखेड शहराचा जवळपास ४० टक्के भाग येतो. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, न्यायालय इमारत, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच अनेक शाळा व महाविद्यालय आहेत. परिणामी, प्रस्तावित उड्डानपूल होणे अत्यंत गरजेचे आहे, असेही त्या लेखी निवेदनाद्वारे म्हटले आहे. त्याचबरोबर शहरातील प्राध्यापक कॉलनी, भंडारी कॉलनी, अरुणोदय कॉलनी, ममता कॉलनी, महात्मा फुले नगर, तुळजाभवानी नगर, राजीव गांधी नगर, बंजारा कॉलनी, जनाबाई नगर, व्यंकटेश नगर, अजिंठा नगर, गौतम नगर, मन्नाथ नगर, कृष्णा नगर, माणिक नगर, माऊली नगर, यज्ञभुमी यासह बालाघाटच्या डोंगर रांगेतील किमान ५० ते ६० गावातील नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परिणामी, रेल्वे फाटकाच्या खालील भागांमध्ये खासगी व शासकीय दवाखाने आहेत. अनेक वेळेला या फाटकामुळे रूग्णांना प्राण गमवावा लागला आहे. तसेच गरोदर महिला व शालेय विद्यार्थ्यांचेही प्रचंड गैरसोय होत आहे. उड्डाणपूल नसल्यामुळे शहरात सर्वत्र वाहतूक कोंडी होते. वाहानांच्या लांबच लांब रांगा लागतात. एवढेच नाही, तर दिवसातून ३५ ते ४० वेळा रेल्वे गेट बंद होते. त्यामुळे सर्व नागरिकांसह वाहनधारकांची मोठी अडचण होते. त्यामुळे उड्डाणपूल बांधणे शहर व तालुक्यातील जनतेच्या सुखकर दळणवळणासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच सुखकर व आनंददायी प्रवास, शहराचे भविष्य आणि गतिमान दळणवळण यासाठी संबंधित उड्डानपूलाचे बांधकाम त्वरीत सुरू करावे, अशीही विनंती त्या लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. दरम्यान, शहरवासीय व तालुक्यातील जनता आणि वाहनधारकांच्या लोकभावनेचा आदर करून तहसील कार्यालय जवळच्या प्रस्तावित उड्डानपूलाचे बांधकाम त्वरीत सुरू करून सर्व नागरिकांना न्याय देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. अन्यथा उड्डानपूल निर्माण संघर्ष समितीच्या वतीने भविष्यात तीव्र आंदोलन उभारले जाईल. गरज पडली तर, मुंबईच्या आझाद मैदानावर सुध्दा उपोषण करू. पण, उड्डानपूलाच्या बाबतीत कणभर सुध्दा मागे हटणार नाही, इशाही गंभीर इशारा त्या लेखी निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी तसेच शहर व तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. १० दिवसांपासून मोर्चाची तयारी, सोशल मीडियावरून मार्गदर्शन नियोजित मोर्चासाठी १० दिवसांपासून शहर व तालुका, सर्कलपासून ते गावपातळीपर्यंत पूर्वतयारीच्या बैठका घेण्यात आल्या होत्या.

तसेच वातावरण निर्मितीसाठी प्रत्येक गावात रिक्षाद्वारे जनजागृती करण्यात आली होती. परिणामी, सर्व स्तरातील नागरिक व वाहनधारक मोर्चात सहभागी झाले होते. शिवाय, मोर्चा किती वाजता निघेल. कोणत्या मार्गाने तहसील कार्यालयावर जाईल. शहरात पार्किंगची व्यवस्था कशी राहील. येथेपासून काटेकोरपणे नियोजन केले. तसेच सोशल मीडियावरून जनतेला योग्य मार्गदर्शन केल्यामुळे हा विराट आणि भव्य मोर्चा अत्यंत शांततेत आणि शिस्तीत पार पडला. तसेच मोर्चादरम्यान, शहरात कुठलाही अनुचित प्रकार यावेळी घडला नाही. त्यामुळे प्रशासनाने उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीच्या शिस्तपूर्ण नियोजनाचे कौतुक केले.


## राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी पं.स. सभापती व माजी सरपंच यांचा लाखोंचा घोटाळा ?

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील मौजे बलसा येथे रोजगार हमी योजनेमध्ये सन २०१० ते २०१५ या कालावधीत कामे न करताच तत्कालीन सरपंच सौ. वंदना गणेश इलग व गणेश सदाशिव इलग यांनी लाखोंचा घोटाळा केल्याचे दिसून येत असल्याची पुराव्यानिशी तक्रार भाजपचे सरचिटणीस लक्ष्मण इलग यांनी राज्याच्या राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. मेघनादीदी साकोरे - बोर्डीकर यांच्याकडे केली असता जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी दिले आहेत. लक्ष्मण इलग यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेतल्याचे दिसुन येते. तक्रारीनुसार तत्कालीन सरपंच सौ. वंदना गणेश इलग यांनी लाभार्थी माणिक आश्रोबा डोंबे यांच्या नावे सिंचन विहीर मंजूर करुन गट क्रं. २३ मध्ये विहीर खोदली आहे असे दाखवून त्यांचे हजेरी पत्रक स्वतःच्या सहीने पंचायत समिती कार्यालय, जिंतूर येथे दाखल केलेले असून सदर सिंचन विहीरीचे काम न करताच अकुशल आणि कुशलचे देयक उचलुन घेतले आहे परंतू प्रत्यक्षात कामच झाले नसल्याचे लक्ष्मण इलग यांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर वंदना इलग तत्कालीन सरपंच असतांना स्वतःच्या सासू असलेल्या सुभाबाई सदाशिव इलग यांचे शेतगट क्रं. ११८ मध्ये रु.१८८५४७/- रुपयांची रोपवाटीका मंजूर करुन काम न करताच पैसे उचलत शासनाची फसवणूक करण्याचा अजब प्रकार केला आहे. सदर रोपवाटीका मंजूर करण्यासाठी सौ. वंदना इलग यांनी अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्वतः मा. गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, जिंतूर यांना लेखी निवेदनाव्दारे विनंती केलेली आहे. तसेच स्वतः बोगस ठराव घेत ग्रामसेवक व इतर अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांच्यावर दबाव टाकत रोपवाटीकासाठी योग्य नसलेली व शासनाच्या निकषात बसत नसलेली गट क्रं. ११८ ची स्वतःच्या सासूची जमिन कशी योग्य आहे हे दाखवण्यासाठी स्वतः स्थळपाहणी करत अहवाल देखील सादर केलेला आहे. हे सर्व करत रोपवाटीकेचे काम न करताच शासनाची फसवणूक करत हडप करण्याचे काम सासू व सुन असलेल्या सुभाबाई सदाशिव इलग व तत्कालीन सरपंच सौ. वंदना गणेश इलग यांनी केले असल्याचे लक्ष्मण इलग यांचे म्हणणे आहे. वंदना इलग यांनी सरपंच असतांना सन २०१२ साली सरकारी गायरान मध्ये वृक्षलागवड केली आहे असे दाखऊन वृक्षलागवडन करताच शासनाची फसवणूक करत लाखो रुपये हडप केले आहेत. तत्कालीन सरपंच वंदना इलग यांनी ग्रा.पं. चे बँक खाते क्रं. ६२०५८७५२१६८ वरून लाखे रुपये स्वतः उचलण्याचे काम केले असून सदरील रक्कम हि रोपवाटीका व वृक्षलागवड ज्यांचे काम झालेले नाही त्या कामांची आहे असे लक्ष्मण इलग यांचे म्हणणे आहे. तत्कालीन सरपंच वंदना इलग यांचा भ्रष्टाचाराचा घोटाळयांचा विक्रम मोडीत काढण्यासाठी त्यांच्या नंतर सरपंच झालेले गणेश इलग यांनी देखील शासनाची फसवणूक करत कामे न करता पैसे हडप करण्याचे काम सुरु ठेऊन रोहयो अंतर्गत चे काम न करताच रु.२३ लक्ष रुपये उचलण्याचा पराक्रम तत्कालीन सरपंच गणेश इलग यांनी केला आहे. रोजगार हमी योजना अंतर्गत सदरील कुटूंबाने लाखो रुपयांची शासनाची फसवणूक केली असून त्यांच्यावर कार्यवाहीची मागणी लक्ष्मण इलग यांनी केली आहे. वंदना इलग त्यांचे पती गणेश इलग, सासु सुभाबाई इलग व माणिक डोंबे यांनी संगनमत करुन रु.२६,८५,२७८ या पेक्षा अधिक रक्कमेचा अपहार केला असल्यामुळे पालकमंत्र्यांनी यासर्वांची उच्चस्तरीय चौकशी करावी व दोषींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी भाजपचे सरचिटणीस लक्ष्मण इलग यांनी केली होती.

### श्रीकांत सुरेशराव काळे यांचे निधन

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर ते औंढा रोडवर लिंबाळा पाटीवर दुचाकी व टिपर अपघातामध्ये एक ठार. शुक्रवार दिनांक १६ मे रोजी सकाळी सात वाजता लिंबाळा येथील युवक श्रीकांत सुरेश काळे वय १८ वर्ष हा युवक दुचाकी वर आडगाव फाट्याकडे जात असताना लिंबाळा पाटीपासून काही अंतरावर उभा असलेला टिप्पर ला पाठीमागून जोरात धडक दिल्यामुळे श्रीकांत च्या डोक्याला व छातीला गंभीर मार लागल्याने त्याला तात्काळ परभणी येथील रुग्णालयात नेण्यात आले. परभणी रुग्णालयात उपचार घेत असताना प्रकृती चिंताजनक असल्यामुळे डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी हैद्राबाद येथे पाठवले, हैदराबाद येथे उपचार चालू असताना डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय वसा या शाळेवरील शिक्षक सुरेश काळे यांचा तो मुलगा होता.



## ऑपरेशन सिंदूर मधील सैन्याच्या सन्मानार्थ पूर्णा शहरात बाईक तिरंगी रॅली

### पूर्णा शहर घोषणांनी दणाणले

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** शहरातील नागरिकांनी २१ रोजी सकाळी ११ वाजता शहरातून तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून करण्यात आली.



मातृभूमीच्या रक्षणार्थ प्राणांची बाजी लावून भारतीय सैन्याने जे शौर्य गाजवले त्यांच्या शौर्याला नमन करण्यासाठी भारतीय सैन्याप्रति समर्थन करण्यासाठी या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील माजी सैनिक गणेश भाऊ कदम, मन्नुसिंह ठाकूर , शंकरराव डहाळे ,सोमनाथ काकडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी लक्ष्मीकांत कदम ,डॉ. अजय ठाकूर ,नितीन कदम ,हरिभाऊ कदम , ॲड. राजेश भालेराव, प्रभूदयाल ओझा, एकनाथ काळबांडे, ईश्वर परडे ,बळीराम कदम, गोविंद राज ठाकर,प्रशांत कापसे, प्रताप कदम, विष्णू कमळू, वैभव भायेकर, सुनील डूबेवार राजेश धूत, राम पुरी, सुरेंद्र चिटणीस,भारत ऐकलारे , ॲड संजय गव्हाणे ,सतीश टाकळकर, संपत तेली, मधुकर जोशी ,बाबा ठाकूर, राजू महाजन,विजय कणकदंडे, लक्ष्मण वांगे, गजानन कदम, अबनराव पारवे, हनुमान अग्रवाल, संतोष पळसकर ,गोविंद ठाकूर, विश्वनाथ होळकर ,निलेश आगलावे ,ईश्वर ठाकूर ,किशोर सूर्यवंशी ,हर्षल महाजन,अनिल बागल, देशभक्त नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यशाचे श्रेय विद्यार्थी,शाळा कि खाजगी शिकवणी वर्गाचे ?

### पालकात सभ्रंम,श्रेय लाटण्यासाठी चढाओढ

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** इयत्ता बारावी व दहावीचा निकाल नूकताच लागला असून यामध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेल्या गूणवंत विद्यार्थी नेमके विशेष प्राविण्यामध्ये उत्तीर्ण झाले असले तरी त्याच्या यशाचे नेमके हकदार शाळा,खाजगी शिकवणी वर्ग की त्या विद्यार्थ्याची मेहनत असा प्रश्न निर्माण होत आहे.दरम्यान यशाचे श्रेय घेण्याची चढाओढ खाजगी शिकवणी वर्ग व शाळांमध्ये लागली आहे.तर विद्यार्थ्याची मेहनत यामध्ये नाही का?असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

शहरासह ग्रामिण भागात शाळा व महाविद्यालयाची संख्या ३० ते ३५ च्या जवळपास आहे.यामध्ये जिल्हा परिषद व खाजगी शाळांचा समावेश होतो.बारावी परिक्षेचे तालूक्यातील चार केंद्रातून १हजार २३३विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली तर दहावी ६ केद्रातून २ हजार २८८ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती दरम्यान या दोनही परिक्षांचे निकाल घोषीत झाले आहेत.मात्र खरेच शाळामध्ये या परिक्षामध्ये उत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गूणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले का?की खाजगी शिकवणी वर्गाचा गूणवत्ता वाढीसाठी विद्यार्थ्यांना फायदा झाला?हे जरी श्रेय लाटण्याचा खटाटोप असला तरी मात्र विद्यार्थ्यांची गूणवत्ता नेमकी कोणामूळे वाढली हे त्या विद्यार्थ्यास माहित असणार आहे.शहरासह तालूक्यात अनेक नामांकीत शिक्षण संस्था आहेत सद्यस्थितीत गूणवतेच्या तूलनेचा विचार केला तर अनेक शाळामध्ये (काही अपवाद असतील) रोज होणारे अध्यापनाचे वर्गच होत नसल्याची माहिती पालकावर्गातून येत आहे.तर मग केवळ त्या शाळेत प्रवेश आहे व ते विद्यार्थी गूणवत्ता यादीत येतात म्हणून श्रेय कोणी घ्यावे शाळेने की खाजगी शिकवणीने.शाळेत तासिका होत नसल्याची ओरड होत आहे तर केवळ दिखावा म्हणून त्या विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ कशासाठी हे समजणे अवघड झाले आहे.शाळेत इतरही अनेक विद्यार्थी शिक्षण घेतात त्यांच्या गुणवत्तेची जबाबदारी कोणाची आहे हा मूद्दा या निमित्ताने समोर येत असला तरी मात्र या यशाचे श्रेय नेमके कोणाला द्यायचे हा प्रश्न उपस्थित होत आहे.



गूणवत्तेसह संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यावर भर केवळ गूणवत्ता मिळवून दहावी व बारावी उत्तीर्ण होवून डाँक्टर,इंजिनिअर व अधिकारी झाले तरी जर संस्कार हा घटक समाजामध्ये वावरतांना महत्वाचा आहे तर शहरातील काही शाळामधून ही संस्कारमूल्य रूजविण्याचे काम करण्यात येत असून निकाल हा किती टक्के हे न पाहता ती मूल्य रूजली पाहिजेत यासाठी प्रयत्न केला जात आहे. शहरातील अनेक शाळात विद्यार्थ्यांच्या गूणवत्तेसाठी प्रयत्न केले जात आहेत ही वास्तव परिस्थिती नाकारता येत नाही.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर बीड पोलिसांची करडी नजर

## कठोर कारवाई होणार-पोलीस अधीक्षक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ मे**

सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे समाजात चुकीचे संदेश पसरवण्याचे प्रमाण वाढले असून, त्यातून समाजात तेढ निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. बीड जिल्ह्यात अशाच प्रकारे काही समाजकंटकांकडून आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करून त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.



जिल्ह्यातील सामाजिक सलोखा अबाधित राखण्याची जबाबदारी प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर अत्यंत जबाबदारीने करण्याचे आवाहन बीड पोलिसांनी केले आहे. कोणीही आक्षेपार्ह फोटो किंवा व्हिडिओची खातरजमा न करता तो पुढे पाठवू नये किंवा शेअर करू नये.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भा.पो.से.) यांनी सांगितले की, अशा प्रकारचे आक्षेपार्ह व्हिडिओ, फोटो किंवा मजकूर सोशल मीडियावर व्हायरल केल्यास, किंवा त्यातून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्यास, संबंधित व्यक्तींवर गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जर यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला किंवा सार्वजनिक/खाजगी मालमत्तेचे नुकसान झाले, तर त्याची जबाबदारी संबंधित व्यक्तींवर निश्चित करण्यात येईल.सायबर पोलीस विभाग अशा पोस्टवर बारकाईने नजर ठेवून आहे. त्यामुळे नागरिकांनी कुठलाही आक्षेपार्ह कंटेंट मिळाल्यास तातडीने जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधून त्याची सत्यता पडताळून योग्य ती माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती बाबत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ मे**

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईट www.beed.nic.in वर दि.२१.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज A-४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित - हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड-४३११२२ या पत्यावर दिनांक २३ मे, २०२५ रोजीपासून ते दि. ०५ जून, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत. या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ www.beed.nic.in वर प्रसिद्ध करण्यात येईल.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# आकाशात वीज चमकत असताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ मे**

हंगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या विविध भागात वीज चमकण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वीज कोसळणे ही एक गंभीर नैसर्गिक आपत्ती असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांना खालील खबरदारीचे उपाय काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

वीज चमकत असल्यास घ्यावयाच्या खबरदारी:

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करू नका:

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करू नका. तसेच कुठल्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या साह्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडांच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारात अथवा खिडकीतून वीज पडताना बाहेर पाहू नका व बाहेर थांबणे तितकेच धोकादायक आहे.

उपयोगी मोबाईल प्सची माहिती:

दामिनी प - हे प भारतीय हवामान विभागाने (खचऊ) विकसित केले असून विजेच्या गडगडाट आणि संभाव्य ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळवून देण्याचा उद्देश आहे. हे प आपल्या स्थानाच्या २० किमी परिसरात वीज कोसळण्याची शक्यता असल्यास तात्काळ अलर्ट पाठवते. वापरण्यास अगदी सोपे असून मराठीसह विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. Google Play Store आणि Apple App Store वर हे प मोफत उपलब्ध आहे.सचेत प - हे प आपत्ती व्यवस्थापन विभागाने विकसित केले असून भूकंप, पूर, वीज चमकणे, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या अलर्टस पुरवते. स्थानिक हवामान आणि संभाव्य आपत्तींची अचूक माहिती, सजगता आणि मार्गदर्शन यातून मिळते. या पच्या साह्याने नागरिक वेळेत सुरक्षिततेचे पावले उचलू शकतात. Play Store आणि App Store वर मोफत उपलब्ध आहे.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील खबरदारीचे उपाय वेळेवर आणि शिस्तबद्धपणे पाळावेत. प्रशासन आपत्ती व्यवस्थापनासाठी सदैव सज्ज असून नागरिकांनी देखील सजग राहणे गरजेचे आहे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.



कल्याण विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे गेल्या दोन दिवसापूर्वी झालेल्या पावसामुळे नाल्याचे पाणी राष्ट्रीय महामार्गावर डोह साचल्यामुळे वाहन चालकांना पाण्यातून वाट काढावी लागत आहे (छाया कृष्णा शिंदे)

# बीडच्या विकासासाठी वाढीव निधी -उपमुख्यमंत्री अजित पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ मे**

बीड जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत जिल्हयाचा ५७५ कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला.

या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

समिती प्रतिनिधींमध्ये आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला.

वर्ष २०२४-२५ चा आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम १०० टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले.

मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली.

गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या व दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिल्हयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे.

गतवर्षी ४८४ कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात ४४६.३० कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता यात वर्ष २०२५-२६ करिता १२८ कोटी रुपयांची वाढ करुन तो ५७५ कोटींचा करण्यात आला आहे. २०२२-२३ च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय.

## जिल्हा नियोजनाचा ५७५ कोटींचा आराखडा सादर



नियोजन समितीमधील कोणतेही काम १५ लाख रुपयांपेक्ष कमी असू नये तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत.

कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर १५ दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे.

वर्ष २०२५-२६ साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास २१ कोटी, जिल्हा आरोग्य अधिकारी १८.२ कोटी, जिल्हा शल्य चिकित्सक २८.५० कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय २० कोटी, प्राथमिक शिक्षण २८. ५० कोटी, जलसंधारण ३६ कोटी, महिला व बाल कल्याण १८. ३९ कोटी, ग्रामीण रस्ते १०५ कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे.

पशुधन विकासासाठी २२.२८ कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस.आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुग्धोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला.

यासोबत नागरी क्षेत्र विकास ६३. ६६ कोटी, उर्जा विकास ३१ कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना १६.३५ कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन ७. ४३ कोटी, क्रीडांगण विकास ४.२० कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे.

# धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट

**दिवटे कुटुंब माझ्या घरातले, शिवराजच्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी - धनंजय मुंडे**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२१ मे**

दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.



शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली.शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, सुरज ला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

# अंबाजोगाई तालुक्यात शिक्षण संस्थेअंतर्गत होणारी प्रवेश प्रक्रिया गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखाली पूर्ण करून डोनेशन घेणाऱ्या शाळेवर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२१ मे**

अंबाजोगाई तालुक्यात शिक्षण संस्थेअंतर्गत होणारी प्रवेश प्रक्रिया ही गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अधिपत्याखाली पूर्ण करून डोनेशन घेणाऱ्या शाळेवर तात्काळ कठोर कारवाई करा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी केली आहे. याबाबत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे वतीने अंबाजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना सोमवार, दिनांक १९ मे रोजी निवेदन देण्यात आले आहे.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनानुसार सोमवार रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अंबाजोगाई तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व खाजगी शाळेतून प्रवेशासाठी बऱ्याच शाळेतून पैशांची मागणी केली जाते व पैसे आकारणी केल्याशिवाय विद्यार्थ्यांना त्या संबंधित शाळेतून प्रवेश दिला जात नाही. तसेच प्रवेशावेळी डोनेशन म्हणून घेतलेल्या त्या पैशांची अधिकृत पावती ही दिली जात नाही. यामुळे पालकांची मोठी कुचंबना होत आहे. शिवाय कामात दिरंगाई पण केली जाते. आपल्या आदेशानुसार प्रत्येक शाळेमध्ये नोटीस बोर्डावर 'येथे डोनेशन घेतले जात नाही' असे दर्शनी भागावर ठळकपणे नोटीस लिहिण्यात यावी अशी विनंती ही निवेदनातून केली आहे. वास्तविक प्राथमिक शिक्षण कायदा २००९ नुसार कोणत्याही शाळेला कुठली ही फीस आकारता येत नाही, तरी ही अनाधिकृत फी (डोनेशन) वसूल करण्याची पद्धत शासन नियमानूसार सर्व इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळांमधून बंद करावी व अशा शाळांची सखोल चौकशी करण्यासाठी गटशिक्षण अधिकारी यांनी एक समिती निवडावी व विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय द्यावा साहेबांनी या प्रकरणी लक्ष देऊन या समस्या सोडवाव्यात अशी सहकार्याची अपेक्षा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी गटशिक्षण अधिकारी, गटशिक्षण कार्यालय अंबाजोगाई तसेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख रणजित डांगे, हिंदूलाल आबा काकडे, बा.ह.शेरेकर, माऊली वैद्य, प्रशांत आदनाक, नानासाहेब धुमाळ, ओमकार चव्हाण, धनंजय सुरवसे, नानासाहेब गायकवाड, विजयानंद सोळंके, लहुजी शिंदे, शेख अकबर, दयानंद गुजर, सचिन राऊत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

# सिमेंट रस्त्यांवर डांबर टाकून खड्डे बुजवण्याचा प्रयत्न-ॲड.जीवनराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० मे**

**राष्ट्रवादी कॉँग्रेसकडून आंदोलनाची चेतावणी**

परळी शहरात नगरपालिकेच्या वतीने सिमेंट रस्त्यांवरील खड्डे डांबर टाकून बुजवण्याचा प्रकार सुरू असून, यामागे केवळ पालकमंत्र्यांच्या दौऱ्यानिमित्त शहरातील रस्त्यांची डागडुजी दाखवून मलिदा लाटण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे करण्यात आला आहे.

शहरात तीर्थक्षेत्र विकास, नगरोत्थान योजना आणि विविध योजनांतून कोट्यवधी रुपये आले असतानाही रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. विशेष म्हणजे, सिमेंट रस्त्यांवर डांबर टाकून खड्डे बुजवण्याचे काम सुरू असून, हे केवळ पालकमंत्र्यांसमोर शहराची प्रतिमा चांगली भासावी म्हणून केले जात आहे. त्यामुळे सिमेंट रस्त्यांवरील डांबर स्पॅचिंगसाठी बिल काढून पुन्हा आर्थिक बोजा टाकण्याची तयारी सुरू असल्याचा आरोपही या पक्षाकडून करण्यात आला.राष्ट्रवादी कॉँग्रेसचे परळी शहराध्यक्ष ॲड. जीवन देशमुख यांनी मागणी केली आहे की, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक यांनी सदरील प्रकाराची गंभीर दखल घ्यावी. सिमेंट रस्त्यावर डांबर टाकण्याचे कोणतेही बिल मंजूर करू नये. तसेच रस्त्यांच्या दुरवस्थेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी आणि त्यांच्याकडून झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली करून दंड आकारावा.या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) परळी शहरात तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही ॲड. जीवन देशमुख यांनी दिला आहे.